
ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी
कृतिशीलता जोपासणारे मासिक!

# छात्र प्रबोधन

सौर फाल्गुन, शके १९३५
वर्ष १४ अंक ६
मूल्य रुपये पंधरा




# दोघेही हवे !

राष्ट्ररथाला विजयी व्हाया समबल चक्रे दोन हवी
वज्रासम दृढनिश्चय आणिक बिजली सम समशेर हवी

समाजपक्ष्या, नभ जिंकाया पंखहि तुजला दोन हवे
गती हवी तुज, दिशा हवी अन् अमोघ ऐसे धैर्य हवे


जीवन–अंकुर रुजुनी येण्या, सूर्यकरांची ऊब हवी
आणि त्याच्या भरण पोषणा माय मातिची प्रीत हवी





वादळवाऱ्यापासून जपण्या, कणखर, वत्सल हात हवे
दीपज्योतिला सुतेज करण्या अमृत हृदयातील हवे

रणभेरींचा घोष हवा अन् मुरलीचा स्वरस्पर्श हवा
दुष्टविनाशी शौर्यालागी ममतेचा आशीष हवा



शंकर करितो तांडव आणिक नृत्य देविचे लास्य असे
जगताच्या या मायपित्यांचे अपूर्व ऐसे ऐक्य असे

कोण श्रेष्ठ हा वाद कशाला? जग तर दोघांचे घडले
शिवशक्तीची गुंफण होऊन विश्वरूप दिसते सजले !



# छात्र प्रबोधन

**सौर फाल्गुन, शके १९३५। वर्ष १४ अंक ६**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै – ऑगस्ट १९९२) २६० वा अंक, वर्ष २२ अंक ८

प्रकाशन दिनांक – सौर १० फाल्गुन, शके १९३५/१ मार्च २०१४


ॐ

*इवली शल्ये रुपती खुपती*
*मात करू दे त्यांच्यावरती*
*प्रगल्भतेचे पंख देऊनी*
*ने ज्योतिर्जगतात*

## • अंतरंग •


४. **संवाद** – महेन्द्र सेठिया

५. कथा ... **वाढदिवसाची भेट** – नीला खेर

**✻ जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विशेष विभाग**

९. व्यक्तिपरिचय... **स्त्री शिक्षणाचे शिल्पकार 'महर्षी धोंडो केशव कर्वे'** – मृणालिनी चितळे

१२. ललित... **भिरभिरं** – सुनील शिनखेडे

१५. व्यक्तिविकसन... **चित्त जेथे भयशून्य...उंच जिथे माथा...!** – डॉ. अनघा लवळेकर

१८. कविता... **ती** –आसावरी काकडे

१९. कथा... **खरे बक्षीस** – सुनेत्रा नकाते

२३. स्फुटं... **भाषेच्या गमती–जमती**

२५. विज्ञान तंत्रज्ञानातील कल्पकता... ८ **सिनेक्टिक्स्** – डॉ. नलिनी गुजराथी

२७. ललित... **निसर्गरम्य रंगपंचमी** – गणेश दिघे

३०. गणिती खुराक... **जादूचे चौकोन** – भाग ४ – महेन्द्र सेठिया

३२. संवाद कौशल्य...९ **गटचर्चा** – महेन्द्र सेठिया

कव्हर २ वरील पद्य... **दोघेही हवे !** – डॉ. स्वर्णलता भिशीकर

**याशिवाय** – आनंदवार्ता , लक्षात आहे नं...? (८), होताय नं सहभागी...?, छात्र प्रबोधन संदर्भ डी.व्हि.डी. (२६), नेतृत्व संवर्धन शिबिरे (२९), विशेष कौतुक (३१) कॉपीविरोधी अभियान... मलपृष्ठाच्या आतील पानावर मान्यवरांचे संदेश

**तळटिपेतील ओळी** – विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या भारतीय महिला


**मुखपृष्ठाविषयी**

स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठी अवघे आयुष्य वेचलेल्या **महर्षी धोंडो केशव कर्वे** यांचे व्यक्तिचित्र जलरंगाच्या माध्यमातून साकारले आहे.

**– सचिन जोशी**


**♦ संपादक, प्रकाशक, मुद्रक ♦**
महेन्द्र सेठिया

**♦ कार्यकारी संपादक ♦**
शिल्पा कुलकर्णी

**♦ विशेष संपादन साहाय्य ♦**
चारुता परांजपे

**♦ संपादक मंडळ ♦**
शैलजा देशमुख,
नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन

**♦ मुखपृष्ठ ♦**
सचिन जोशी

**♦ आतील चित्रे ♦**
ऋजुता घाटे

**♦ संपर्क पत्ता ♦**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org


**ई–मेल**
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**मासिकाची वर्गणी**
वार्षिक: ₹ १८०, द्वैवार्षिक: ₹ ३४०,
त्रैवार्षिक: ₹ ५००,
दशवार्षिक: ₹ १,५००.
**या अंकाची किंमत : ₹ १५**
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी– ₹ २० जादा,
घरपोच दिवाळी अंकासाठी
प्रतिवर्षी ₹ ४० जादा)



**या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.**


**छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!**



**अधिक जाणून घ्या: सावित्रीबाई फुले** (१८३१–९७) – स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह व अस्पृश्यांसाठी उल्लेखनीय कार्य



संवाद

***गुणवत्ताप्रिय 'विद्यार्थी' प्रबोधकांनो,***

*मागच्या महिन्यात एका कार्यक्रमानिमित्त बुलढाण्याला गेलो होतो. तिथे काही विद्यार्थी भेटायला आले होते. त्यांनी काही प्रश्न विचारले तसेच मीही काही प्रश्न त्यांना विचारले. मी विचारलं, ''आता अभ्यासाला लागणार असाल ना? मार्च मध्ये परीक्षा असेल ना?'' त्यावर दोन विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया दिल्या. एक म्हणाला, ''हो आहे ना! वर्षभर मूल्यमापन चालू असल्याने वार्षिक परीक्षेचं टेन्शन नाही वाटत.'' तर दुसरा लगेचच उत्स्फूर्तपणे म्हणाला, ''आठवीपर्यंत कोणालाच नापास करायचं नाही असं शासनाचं धोरण आहे ना! त्यामुळे काहीच टेन्शन नाही. अभ्यास नाही केला तरी चालणार आहे !'' 'परीक्षेचा ताण वाटत नाही' ही दोघांनीही व्यक्त केलेली प्रतिक्रिया आवडली; पण त्याची कारणे मात्र प्रत्येकाची वेगवेगळी होती. तुम्ही कसा विचार करता?*

*आपल्या केंद्रसरकारने 'शिक्षण हक्क कायदा ' सर्व राज्यांना बंधनकारक केला. त्यामध्ये वय वर्षे ६ ते १४ या वयोगटातील प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षण घेणे बंधनकारक व सक्तीचे केले आहे. या वयोगटातील कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी शासनानेही अनेक उपाययोजना करावयाच्या आहेत. शाळेत प्रवेश घेतल्यावर मध्येच अर्धवट शिक्षण सोडून देण्याच्या विद्यार्थ्यांचं प्रमाण खूप मोठ्ठं आहे. त्याच्या अनेक कारणांपैकी एक कारण विद्यार्थी नापास झाला की, त्याला पुन्हा त्याच वर्गात बसावं लागतं, त्याला विविध आर्थिक लाभांपासून वंचित राहावं लागतं, पुन्हा पुन्हा नापास झाल्यास त्याला शाळेतून काढून टाकण्यात येतं आणि त्यामुळे हे विद्यार्थी शिक्षणाच्या प्रक्रियेतून बाहेर पडतात. अत्यंत दुर्गम भागात, डोंगरदऱ्यांमध्ये, आदिवासी भागात राहणाऱ्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत हा प्रश्न अधिक गंभीर आहे. हे थांबावं म्हणून शासनाने 'आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना नापास करू नका'; असा निर्णय दिला.*

*आपण विद्यार्थ्यांनी याचा असा अर्थ घेऊ नये की, त्यामुळे 'अभ्यास नाही केला तरी चालेल.' खरं तर तुम्हां विद्यार्थ्यांच्या संपूर्ण वर्गाने मिळून असा संकल्प करायला हवा की, 'आमच्या वर्गातला कोणी नापास होणारच नाही, ही जबाबदारी आमच्या वर्गाची!' शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचवणं हे जितकं महत्त्वाचं; तितकंच ते गुणवत्तापूर्ण असणंही महत्त्वाचं नाही का? त्यासाठी तुम्ही सर्वांनीच प्रयत्न करायला हवा. एकट्याने नाही तर गटाने मिळून! यावर्षीच्या वार्षिक परीक्षेत सर्वांनी प्रयत्न करून वर्गातला कोणीही विद्यार्थी नापास होणार नाही, हे तर पाहायचंच; पण वर्गाचे सरासरी गुण २-३-४ टक्क्यांनी वाढवायचेही ! त्यासाठी शाळा सुटल्यावर तास-दोन तास शाळेतच सर्वांनी एकत्र अभ्यास करायचा, असं ठरवता येईल. सुट्टीच्या दिवशी दिवसभर मौनाभ्यास, गटअभ्यास, उजळणी, प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव इ. एकत्र करता येईल. अभ्यासात पुढे असलेले १-२ विद्यार्थी, १-२ मध्यम व अभ्यासात मागे असलेले १-२ विद्यार्थी, असा ५-६ जणांचा एक गट करून, गटागटाने एकमेकांना मदत करत अभ्यास करता येईल. एकमेकांच्या अडचणी सोडवता येतील. रोज प्रत्येकाने किती तास अभ्यास केला, हे नोंदवून ठेवून त्याची एकत्रित नोंद रोजच्या रोज फळ्यावर लिहिता येईल. असं अभ्यासाचं छान वातावरण तयार करून, एकमेकांकडची पुस्तके, गाईड्स, क्लासेसच्या नोट्स एकमेकांना वापरायला देऊन, परस्पर सहकार्याने सगळ्याच वर्गाची गुणवत्ता वाढविण्यासाठी वार्षिक परीक्षा हे निमित्त म्हणून वापरता येईल का?*

*'सर्वांसाठी शिक्षण' हे शासनाचे उद्दिष्ट, तर 'गुणवत्तापूर्ण शिक्षण' हे तुमचं, तुमच्या वर्गाचं उद्दिष्ट असायला हवं! आयुष्यात यशस्वी होण्यासाठी कष्टाला, मेहनतीला, अभ्यासाला पर्याय नाही, हे पक्कं लक्षात ठेवा! तुम्हाला तुमचं (म्हणजे तुमच्या वर्गाचं) उद्दिष्ट गाठण्यासाठी शुभेच्छा तर आहेतच; पण काही मदत, सहकार्य, मार्गदर्शन लागलं तर 'छात्र प्रबोधन' चं संपादक मंडळ व गावोगावचे कार्यकर्ते, केंद्रप्रमुख सदैव तत्पर आहेत!*

*जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विशेष विभाग या अंकात दिला आहे, तो वाचून आपल्या विचारांना, दृष्टिकोनाला योग्य दिशा मिळेल व त्यानुसार कृतीला, आचरणाला चालना मिळेल, असा विश्वास बाळगून आहोत.*

*गुढीपाडव्यापासून सुरू होणाऱ्या जय नाम संवत्सरात, नवीन वर्षात तुमच्या आयुष्यात काहीतरी लक्षणीय, संस्मरणीय घडावं यासाठी तुम्हाला मनापासून शुभेच्छा!*

*सुट्टीतल्या उपक्रमांमधल्या सहभागाची निश्चिती कळवताय ना! आवर्जून वेळ राखून ठेवा!!! त्यानिमित्ताने भेटूया !!*

**तुमचा दादा,**

**(महेन्द्र सेठिया)**





**वृक्षांनी द्यावी छाया, फुलांनी दरवळावं। निर्झरांनी सहजतेने, वात्सल्य शिंपावं।।**

**अधिक जाणून घ्या: पंडिता रमाबाई** (१८५८-१९२२)- कवयित्री व संस्कृत पंडिता, ब्रिटीश सरकारतर्फे कैसर ए हिंद पुरस्कार



**प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे** - दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.



# वाढदिवसाची भेट

– स्वैर अनु. नीला खेर

***'जाँ–पिअेर'ला कुत्रा पाळायची भारी हौस होती. वाढदिवसाची भेट म्हणून त्यानं पपांना एक कुत्रा मागितला होता. पण पपा त्याची ही मागणी पूर्ण करत नाहीत; हे लक्षात येताच अंकल हेक्टर एक युक्ती करतात. काय होती ती युक्ती? अखेर जाँ–पिअरचं कुत्रा पाळण्याचं स्वप्न पूर्ण होतं का? वाचूया सोबतच्या कथेत.***

---

माझं नाव जाँ–पिअेर. मी, *ममा* आणि *पपा* आम्ही *मार्सेमध्ये* राहातो. मला कुत्रा पाळावंसं खूप वाटतं; मग तो कोणत्या का *ब्रीडचा* असेना. पण *पपा* नेहमी सांगतात की, आपण *अपार्टमेंटमध्ये* राहातो; त्यामुळे कुत्रा पाळणं श य नाही.

पण ते काही खरं नाही. माझा मित्र लोदकडे चांगला भला दांडगा *'जर्मन शेपर्ड'* आहे. आणि तोसुद्धा *अपार्टमेंटमध्येच* राहातो की! *ममातर* च क म्हणते की, कुत्रा म्हटलं की, तिचं डोकंच दुखायला लागतं.

आज माझा वाढदिवस. मी बारा वर्षांचा होणार. सगळे नातेवाईक आज संध्याकाळी आमच्याकडे येणार आहेत. आणि सगळेजण न की काहीतरी *प्रेझेंट* आणतीलच.

जेव्हा मी *टेलिफोनवर आँट* एलेन् किंवा *आँट* लुईमारी किंवा *अंकल* जिरार्दशी बोलतो; तेव्हा मी त्यांना नेहमी सांगतो की, मला कुत्रा फार आवडतो. मला कुत्रा पाळायचा आहे. पण सगळेजण हसतात आणि म्हणतात,

''बघूया ! बघूया !''

मी *पपांशी* बोलतो तेव्हा त्यांना अगदी गयावया करून सांगतो, ''मला कसलाही कुत्रा चालेल, काळा, पांढरा, तपकिरी... मोठा लहान...'' न राहवून शेवटी *पपा* म्हणाले की, त्यांनी माझ्यासाठी एक भन्नाट *प्रेझेंट* आणलं आहे. मी विचारलं, ''कुत्रा आणलात का? कोणत्या जातीचा आहे?'' त्यावर ते काहीच न बोलता *डाइनिंग रूममध्ये* आईला *टेबल* सजवायला मदत करायला गेले. *पपांचं* हे नेहमीचंच आहे. जेव्हा त्यांना माझ्या प्रश्नाचं उत्तर द्यायचं नसतं; तेव्हा ते *ममाला* मदत करायला निघून जातात.

*ममाला* विचारलं तर ती एक अक्षरही बोलली नाही. खरंच जर *पपांनी* कुत्रा आणला असेल, तर दोघांचं जाम भांडण होणार !

...दाराची बेल वाजली. मी धावत जाऊन दार उघडलं. *आँट* एलेना आली. *अंकल* मार्क आले. बरोबर अर्थातच एक *प्रेझेंट*. पुन्हा *बेल* वाजली. *आँट* लुई–मेरी आणि *अंकल* जिरार्द. सोबत माझे मावसभाऊ. जॉर्ज आणि हेन्री. तीन *प्रेझेंटस्*.

सगळेजण *डाइनिंग टेबलाभोवती* जमले. मी पाठीमागच्या *पॅसेजमध्ये* थांबलो. आमच्याकडे अशीच पद्धत आहे. सर्वजण आतमध्ये वाढदिवसाच्या केकभोवती *प्रेझेंटस्* लावू लागले. सर्व मांडामांड झाल्यावर *ममाने* हाक दिली, ''जाँ–पिअर.''

मी *डाइनिंग रूममध्ये* गेलो. आहा ! कसला मस्त केक आहे आणि चि कार *प्रेझेंटस्*. पण मला



गुढीपाडव्याचा सण, आता उभारा रे गुढी। नव्या वर्षाचं लेणं, सोडा मनातली अढी ।।

**अधिक जाणून घ्याः रमाबाई रानडे** (१८६२–१९२४) – स्त्री ह क, स्त्री शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी

**प्रायोजक - श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टे सस, अमेरिका.**

*डाइनिंग टेबलावर* कुत्रा काही दिसला नाही.

''अरे, तुझी *प्रेझेंट्स* उघड ना!''ममा उत्साहाने म्हणाली. सगळे हसत होते. मी उसन्या उत्साहानं *प्रेझेंटस्* उघडायला सुरुवात केली. *फ्रेंच-इंग्लिश डिक्शनरी.* एक भडक निळा शर्ट. बॉलपेन आणि कागदांचा गठ्ठा. ''हे तुला *काँपोझिशन* लिहायला, बर का!'' *आँट* एलेन पक्ष्यांचे *डिझाइन* असलेला एक *नेकटाय.* आणि ममाने एक टेनिसची *रॅकेट* दिली.

''अरेच्या ! कमाल केली मी. तुझं *प्रेझेंट किचनमध्येच* राहिलं की,'' पपा.

मी धावतच *किचनमध्ये* गेलो. तेथे एक मोठा *बॉक्स* होता. माझा कुत्रा. पपांनी *बॉक्स* उचलून आणला व *डाइनिंग टेबलावर* ठेवला.

''चल, उघड तुझं *प्रेझेंट* सगळ्यांच्या समोर,'' *ममा.*

मी चाकू घेतला आणि झटपट सगळ्या *रिबन्स* कापून काढल्या. *बॉक्स* उघडला तर काय - कॅमेरा!

''कॅमेरा? आणि माझा कुत्रा कुठे आहे?''

''चल, आमचा सर्वांचा *फोटो* काढ,'' जॉर्ज आणि हेन्री एकमेकांना ढकलत म्हणाले.

''*बोअर*!'' मी हिरमुसलो.

एवढ्यात दरवाजाची बेल वाजली. *ममानं* दार उघडलं तर *अंकल* हे टर. *अंकल* हे टर चि कार श्रीमंत आहेत आणि तसेच वेगळे पण. ते नेहमी तुम्हाला चाट करणारी *प्रेझेंटस्* देतात.''

''*हॅपी बर्थडे !*'' *अंकल* हे टर नेहमीच्या उत्साहानं म्हणाले, ''तुझ्यासाठी एक *सरप्राइझ प्रेझेंट* आणलं आहे. बाहेर *पॅसेजमध्ये* आहे. जा, बघ.'' आणि ते हसू लागले.

मी दार उघडून *पॅसेजमध्ये* गेलो आणि थ क होऊन जागेवरच खिळलो. *पॅसेजमध्ये* एक गोरिलाचं पिल्लू उभं होतं. ते माझ्यापेक्षाही थोडंसं उंच होतं आणि त्याच्या अंगावर गडद तपकिरी रंगाची लव होती. काय करावं ते मला सुचेना. ''*गुड इव्हिनिंग,*'' मी म्हटलं कारण गोरिलाशी काय बोलायचं ते मला सुचतच नव्हतं. पिल्लू नुसतंच माझ्याकडं केविलवाणं बघत राहिलं.

''ये ना, आत ये. आतमध्ये केक आहे.'' मी पुन्हा त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला आणि त्याच्या हाताला धरून त्याला हळूहळू *डाइनिंग रूममध्ये* आणलं.

आम्हाला पाहून *आँट* लुई-मेरीनं एक किंकाळी फोडली आणि ती *कार्पेटवर* बेशुद्ध पडली. *ममा किचनमध्ये* पळून गेली आणि तिनं *किचनचा* दरवाजा बंद केला. माझे मामा आणि *पपा डाइनिंग टेबलापासून* सरकत सरकत हळूहळू दूर खिडकीपाशी जाऊन उभे राहिले. *अंकल* हे टर, *आँट* एलेन, जॉर्ज, हेन्री, गोरिला आणि मी एवढेच टेबलाच्या भोवती राहिलो. मी केक कापला आणि सर्वांना दिला. गोरिलाला केक भलताच आवडला. त्यानं *अंकल* हे टरकडे पाहिलं. *अंकल* हे टरनं एक भला मोठा तुकडा कापून त्याला दिला.

''जाँ- पिअेर, गोरिलाचं नाव आहे 'लुलू'. फार मायाळू आहे तो.'' *अंकल* हे टर सांगू लागले, ''आणि हो, त्याला फळे खूप आवडतात.''

''हे टर,'' *पपा* किंचाळले. ''हा काय चावटपणा आहे? *अपार्टमेंटमध्ये* गोरिला?''

''त्यात काय? मी एवढ्या प्रेमाने जाँ-पिअेरसाठी *प्रेझेंट* आणलं आणि तुम्ही माझा अपमान करता?''

''तसं नाही रे ! अपमान कसला. पण आता *अपार्टमेंटमध्ये* गोरिला कसा राहील?'' त-त-प-प करीत पपा म्हणाले.

''मग? मला माहीत आहे जाँ-पिअेरला कुत्रा हवाय आणि तुम्ही त्याला काय दिलं... तर *कॅमेरा.*'' *अंकल* हे टर तुच्छतेनं म्हणाले ''माझ्याजवळ कुत्रा असता तर मी न की दिला असता. पण कुत्रा नाही तर नाही, पण मी माझं आवडतं गोरिलाचं पिल्लू दिलं. राहू दे त्याला इथेच. खूप हुशार आहे ते. चार दिवसात जाँ-पिअेर त्याला *ट्रेनिंग* देईल. काही दिवस शिकवेल. तुमची सर्वांचीच करमणूक होईल.'' इतके बोलून आणि केकचा एक मोठा घास घेऊन *अंकल* हे टर निघून

गेले.

पपा भयंकर संतापले होते. *ममा* अजून *किचनमध्येच* होती आणि *आँट* लुई मेरी गालिचावर आडवी.

''तुम्ही पाहा *पपा*, लुलू आपली छान करमणूक करेल. तुम्हालासुद्धा तो आवडायला लागेल. अगदी मज्जा येईल.''

''चूप... जाँ-पिअेर. आत्ताच्या आत्ता तू आणि लुलू तुझ्या खोलीत जा आणि दार बंद करून घ्या.''

...लुलूची आणि माझी मैत्री जमायला वेळ लागला नाही. तो अगदी हुशार आणि प्रेमळ होता. बिचारी *ममा* उगाचच त्याला घाबरत होती. *पपा* जरा जास्त धीट होते. ते लुलूच्या आजूबाजूला असायचे; पण त्यांचे डोळे सावधपणे लुलूवर खिळलेले असायचे. लुलू बिचारा केळी आणि संत्र्यांचा फडशा पाडायचा.





काय करणार ! *ममा* त्याच्यासाठी काही जेवायचं करतच नसे.

चार दिवसांनी मी धीर करून विचारले, ''*पपा*, तुम्हाला लुलूच्या नवीन *ट्रिक्स* पाहायच्या आहेत?''

''बघू तरी,'' *पपा* कसेबसे म्हणाले.

''लुलू, *खाली बस.*''

लुलू *पपांजवळ* गेला आणि त्यांच्या मांडीवर बसला.

''लुलू, *जमिनीवर झोप.*''

लुलूनं आपल्या हातातलं केळं सोललं आणि *पपांच्या* डो यावर ठेवलं.''

''जाँ-पिअेर, या ढढ्ढोबा गोरिलाला काही समजत नाही,'' *पपा* किंचाळले. जाँ-पिअेरने मनातल्या मनात विचार केला, 'ठीक आहे. प्रत्येक वेळी त्याला सर्व काही समजेलच असं नाही. आपण जरा समजून घ्यायला हवं.'

''*पपा*, खरं तर लुलू खूप हुशार आहे. तुम्ही जाऊन तुमच्या आरामखुर्चीत बसा. लुलूनं एका उडीत खुर्चीत बसलेल्या *पपांना* गाठलं आणि त्यांच्या मांडीवर बसून लडिवाळपणे आपले हात त्यांच्या गळ्याभोवती टाकले. बिचारे *पपा* !

''लुलू, *माझ्याशी शेकहँड कर,*'' लुलूनं आपला एक पाय त्यांच्या तोंडापुढे धरला.

ठीक आहे. गोरिलाचे हात काय आणि पाय काय सारखेच!

''लुलू, *आता कोलांट्या उड्या मार पाहू,*'' मी म्हणालो. काय आश्चर्य. लुलू उडी मारून *कार्पेटवर* आला आणि चेकाळल्यासारखा घरभर कोलांट्या उड्या मारू लागला. त्याला कसलं भानच राहिलं नाही. नेम या त्याच वेळी *ममा किचनमधून* बाहेर आली. लुलूने तिच्यासमोर एक



**उत्साहाची, चैतन्याची, कुणी उधळली जणू मूठ। सौगंधाची दिशात दाही, दिसे चालली लयलूट।।**

**अधिक जाणून घ्या: सरोजिनी नायडू** (१८७९ - १९४९)- स्वातंत्र्य सेनानी, कवयित्री व पहिल्या महिला राज्यपाल



**प्रायोजक - सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे.**

कोलांटी उडी मारली आणि तिलाही एक कोलांटी खायला लावली. *ममा* किंचाळली आणि कशीबशी उठून कोचावर बसली. लुलू तिच्या शेजारी बसला आणि एक केळं सोलून तिला देवू लागला.

''लुलू, *इकडे ये,'"* मी ओरडलो. लुलूनं मला एका हातानं पकडलं आणि दुसऱ्या हातानं केळं *ममाच्या* तोंडाजवळ नेलं.

*पपा* उठले आणि *टेलिफोनजवळ* गेले. आता ते पोलिसांना बोलावणार आणि लुलूला... माझी घाबरगुंडी उडाली.

इत यात *बेल* वाजली. मी दार उघडलं तर *अंकल* हे टर. लुलूनं *ममाला* सोडलं आणि धावत जाऊन तो *अंकल* हे टरच्या गळ्यात



पडला. एका हातानं त्याला जवळ घेऊन थोपटत दुसऱ्या हातानं *अंकल* हे टरनं *पपांना फोन* ठेवण्याची खूण केली. *पपांनी रिसीव्हर* खाली ठेवला. *अंकल* हे टरचं कोणी ऐकणार नाही, असं कसं होईल?

''मी अगदी नेम या वेळी आलो म्हणायचं. तुम्हाला कोणाला लुलू आवडत नाही असं दिसतंय?'' कोणीच काही बोललं नाही.


''ठीक. मी माझ्या लुलूला घेऊन जातो; पण जाँ-पिअेरला वाढदिवसाचं *प्रेझेंट* तर द्यायलाच हवं. जाँ-पिअेर, तुला काय पाहिजे? गोरिला की कुत्रा?''

''कुत्राऽऽ'' मी काही म्हणायच्या आधीच *ममा* आणि *पपा* ओरडले. *अंकल* हे टरनं मला एक 'गोजिरवाणं' पिल्लू आणून दिलं ! आता माझ्याकडेही माझा मित्र लोदसारखा कुत्रा आहे मिरवायला. हो, लोदची उगीच हुशारी नको !

**Le Gorille d' Anniversaire**
या फ्रेंच कथेचा स्वैर अनुवाद
**- नीला खेर**
७७३/८, एकांत अपार्टमेंटस्
डे कन जिमखाना, पुणे 411004

## ✻ आनंदवार्ता ✻

'छात्र प्रबोधन'च्या दिवाळी अंकाला महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूरतर्फे विशेष पुरस्कार !




## लक्षात आहे नं...?

काय मंडळी, परीक्षेची तय्यारी जोरदार सुरु असेल नं... मनातल्या मनात तुमचं परीक्षेसाठीचं 'काउंट डाऊन' सुरूही झालं असेल... परीक्षेनंतर येणाऱ्या सुट्टीची तुम्ही सर्वजण आतुरतेनं वाटही पाहात असाल, हो नं? मागील अंकात आवाहन केलेली **एक गोष्ट सुट्टीत आवर्जून करायची, आहे नं लक्षात !**

**छात्र प्रबोधनच्या विद्यार्थी विशेषांकासाठी (सौर आषाढ, जुलै २०१४) तुम्ही लिहिलेले लेख/चित्र पाठवणार ना छात्र प्रबोधनकडे?**

**त्याविषयी अधिक तपशील पुढील अंकात वाचा.**

**साहित्य व चित्रे पाठवण्याचा अंतिम दिनांक १० मे २०१४**

*याशिवाय मासिकाच्या संपादनात ज्यांना रस असेल, शिवाय सुट्टीत रोज येऊन अंकासाठी जे वेळ देऊ शकतील अशांनी आपली नावं 'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयात २५ एप्रिल २०१४ पर्यंत जरूर नोंदवावीत. काही शंका असल्यास 'छात्र प्रबोधन'च्या संपादक विभागात संपर्क साधावा.*

**तुम्हाला परीक्षेतील सुयशासाठी 'छात्र प्रबोधन'तर्फे खूप साऱ्या शुभेच्छा !!**

आनंदाने जीवनाकडे सदैव पाहत राहणे। नव्या सुरांत गात जावे, धुंद नवे तराणे।।

**अधिक जाणून घ्या: राजकुमारी अमृतकौर** (१८८९-१९६४)- स्वातंत्र्य सेनानी, 'भारत छोडो' आंदोलनात सहभाग

**प्रायोजक - श्री. सुधीर विष्णू दफ्तरदार, पुणे.**

## *जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने... विशेष विभाग*



*स्त्री आणि पुरुष यांच्यातील परस्पर सामंजस्य, त्यातून होणारा व्यक्ती व पर्यायाने समाजाचा विकास हा विचार खरंतर नेहमीसाठीच चिंतनाचा विषय ! ८ मार्च 'जागतिक महिला दिन' हे अशा विचारांना प्रकट रूप देण्याचं एक निमित्त!*

*सुरुवातीला, गेल्या शतकाच्या पूर्वार्धात अतिशय प्रतिकूल स्थितीत स्त्री-शिक्षणाच्या प्रसारासाठी अवघे आयुष्य व्यतीत करणाऱ्या **महर्षी धोंडो केशव कर्वे** यांचे जीवन व कार्य याचा परिचय आपण करून घेणार आहोत. **'भिरभिरं'** या ललित लेखात घरातल्या सर्वांसाठी धडपडणारी, तरीही आपल्या सोबतीला स्वत:चं 'फुलपंखी स्वातंत्र्य' जपायचा सावध सल्ला देणारी प्रेमळ आई भेटेल. स्वातंत्र्यातला इतका नाजूक अर्थ आपण कधीच अनुभवला नसेल. 'समाजातील धोके जाणून घ्यायला हवेत; पण त्यामुळे घाबरून न जाता सबल होऊन प्रत्येकाने आत्मनिर्भर व्हायला हवं; मात्र त्यासाठी समाजात निरोगी वातावरण निर्माण व्हायला आपण मदत करायला हवी.' हा **'चित्त जिथे भयशून्य...!'** या लेखातील विचार तुम्हाला अंतर्मुख होऊन कृतिशील बनायला प्रेरणा देईल. शेवटी, 'मुलींप्रमाणे मुलग्यांचेही काही म्हणणं असतं...' त्याचं शब्दरूप म्हणजे **'ती'** ही कविता !*

# स्त्री शिक्षणाचे शिल्पकार 'महर्षी धोंडो केशव कर्वे'

**– मृणालिनी चितळे**



***सुमारे १५० वर्षांपूर्वी 'स्त्री पुरुष समानता, स्त्री स्वातंत्र्य' इ. विचारांना फारसा उद्‌गार मिळाला नव्हता. स्त्रियांची समाजस्थिती न्याहाळणाऱ्या धोंडो केशव कर्वे यांनी आपल्या आयुष्याचा क्षण न् क्षण अनाथ–विधवा स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यात, स्त्रीशिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यात व्यतीत केला. आज महाराष्ट्रात विविध क्षेत्रांत स्त्रिया हिरीरीने आघाडीवर असलेल्या दिसतायंत. त्यामागे महर्षी कर्व्यांसारख्या समाजसुधारकांचे खूप मोठे योगदान आहे. महिला दिनाच्या निमित्ताने त्यांचे चरित्र व कार्य याविषयी हे पुण्यस्मरण!***

इ. स. १८७६ सालचा सप्टेंबर महिना. मुसळधार पाऊस कोसळत होता. रत्नागिरीजवळच्या मुरूड गावातील ४/५ मुले पायीपायी साताऱ्याला जायला निघाली होती; कारण त्यांना सहाव्या इयत्तेची परीक्षा द्यायची होती. त्या काळात रेल्वेगाड्या नव्हत्या की बसगाड्या. आवश्यक तेवढे सामान गाठोड्यात बांधून त्यांनी चालायला सुरुवात केली. एका दिवसात ४८ कि.मी. एवढे अंतर पार करून सर्वजण चिपळूणला पोचले. तिथे त्यांना त्यांच्या गावचा पोलीस अधिकारी भेटला. मुलांची जिद्‌द पाहून त्याने मुलांसाठी घोड्याची सोय करून दिली. घोड्यावर बसून शंभर एक कि. मी.चे अंतर पार करून सर्वजण साताऱ्याला पोचले.

पण मुलांमधील धोंडू नावाच्या मुलाला परीक्षा समितीच्या अध्यक्षांनी परीक्षेला बसायची परवानगी नाकारली. कारण काय तर त्याची लहानखुरी मूर्ती बघून तो सतरा वर्षाचा आहे यावर त्यांचा विश्वास बसेना. हे ऐकून धोंडू निराश झाला; पण त्याने जिद्‌द सोडली नाही. कोल्हापूरला जाऊन त्याने ती परीक्षा दिली आणि उत्तम गुण मिळवून तो उत्तीर्ण झाला. शिक्षणासाठी जीवापाड धडपड करणारा हा 'धोंडू' म्हणजेच शिक्षणमहर्षी धोंडो केशव उर्फ अण्णा कर्वे. १८ एप्रिल १८५८ हा त्यांचा जन्मदिवस. लहानपणापासून त्यांना शिक्षणाची अत्यंत आवड होती. संस्कृत पाठांतर आणि गणित विषयात उत्तम गती होती.



**थोर महात्मे होऊन गेले, चरित्र त्यांचे पाहा जरा। आपण त्यांच्या समान व्हावे, हाचि सापडे बोध खरा।।**

**अधिक जाणून घ्या : रुक्मिणी लक्ष्मीपथी** (१८९२–१९५१) – हरिजन कल्याणी निधी व स्त्री उद्धारासाठी कार्य



**प्रायोजक - श्री. नचिकेत खरे, पुणे.**



वयाच्या विसाव्या वर्षी महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते मुंबईला आले तेव्हा त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्यांचा विवाह झाला होता. एका खोलीत ते राहायला लागले. आपली पत्नी राधाबाई हिला त्यांनी शिकवायला सुरुवात केली. पुढे स्त्री शिक्षणाचे जे प्रचंड कार्य त्यांनी केले त्याची सुरुवात अशी घरापासून झाली. त्या काळात त्यांना पैश्याची चणचण सतत जाणवायची. स्वत: शिकत असताना त्यांनी शिक्षकाची नोकरी स्वीकारली. ते शिकवण्याही करू लागले. पहाटे चार ते रात्री दहापर्यंत ते अखंड काम करत. अशा हलाखीच्या परिस्थितीतही शिकवण्या करून मिळणाऱ्या कमाईतील काही र कम ते समाजकार्यासाठी म्हणून बाजूला काढून ठेवीत. गणित विषय घेऊन ते बी. ए. झाले आणि पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करू लागले. प्रथमपासूनच अण्णांना वाचनाची आवड आणि समाजकार्य करायची ओढ होती. वाचनामुळे त्यांच्या विचारांमध्ये प्रगल्भता आली. त्यांना सामाजिक प्रश्नांची प्रकर्षाने जाणीव झाली.

त्या काळात बालविवाह, केशवपन यांसारख्या दुष्ट चालीरीती, तसेच विधवाविवाह आणि स्त्रियांच्या शिक्षणाला असलेला विरोध यामुळे असंख्य स्त्रियांना आयुष्यभर अपमान आणि दु:ख सहन करावे लागे. वयाच्या आठव्या वर्षी किंवा त्याहून लहान असताना त्यांची लग्ने होत. लहान वयात त्यांच्यावर घरकामाचा बोजा पडे. साधे घराबाहेर पडण्याचीही त्यांना परवानगी नसे आणि घरात राहून लिहायला, वाचायला शिकण्याची मुभाही नसे !! शाळेत जाण्याची तर गोष्टच सोडा. त्यातून वैधव्य आले तर त्यांच्या दु:खाला सीमा उरत नसे. केशवपनासारख्या दुष्ट चालीरीतीला त्यांना सामोरे जावे लागे. दिवसभर कष्ट उपसत आणि उपासतापास करत अंधाऱ्या माजघरात उरलेले आयुष्य त्यांना कंठावे लागे. अशाप्रकारे स्त्रियांवर होणारा अन्याय आणि त्यांचे दु:ख कमी करायचे असेल तर 'स्त्री शिक्षण' हे उत्तम साधन होऊ शकते असे अनेक समाजसेवकांप्रमाणे अण्णांच्याही लक्षात आले. त्यामुळे त्यांनी स्त्री शिक्षणाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून कामाला सुरुवात केली, परंतु त्या काळात स्त्रियांना शिक्षण देणे हे एक आव्हान होते. एखादी स्त्री शाळेत जाण्यासाठी म्हणून बाहेर पडली तर लोक रस्त्यात उभे राहून तिची टिंगलटवाळी करत. तिच्यावर थुंकत. शेणगोळा फेकत. सामान्य स्त्रीला शिक्षणासाठी जो त्रास सहन करावा लागे, त्याहून कितीतरी पटीने अधिक जाच आणि अवहेलना विधवा स्त्रियांच्या वाट्याला येत असणार, याची अण्णांना जाणीव होती. म्हणूनच पत्नी राधाबाई हिच्या अकाली मृत्यूनंतर 'लग्न करीन तर विधवेशीच', असा निश्चय त्यांनी केला. कुणाच्याही विरोधाला न जुमानता 'गोदु जोशी' या बालविधवेशी त्यांनी पुनर्विवाह केला. लग्नानंतर त्या आनंदीबाई उर्फ बाया कर्वे या नावाने ओळखल्या जाऊ लागल्या. त्यांच्या या कृतीमुळे समाजाने त्यांना वाळीत टाकले. परंतु त्यामुळे डगमगून न जाता विधवाविवाह आणि स्त्री शिक्षण यासाठीचे काम त्यांनी नेटाने चालू ठेवले.

१४ जून १८९६ रोजी पुण्यामध्ये पेरूगेटजवळ त्यांनी अनाथबालिकाश्रम या संस्थेची स्थापना केली. त्यासाठी आपल्या बचतीतून हजार रुपये दिले आणि सात विधवा स्त्रियांची राहण्याची आणि भोजनाची व्यवस्था केली. १८९९ साली पुण्यामध्ये प्लेगची साथ आल्यामुळे आश्रम गावाबाहेर हिंगणे येथे हलवावा लागला. अण्णा दिवसभर फर्ग्युसन महाविद्यालयात काम करून संध्याकाळी हिंगण्याला जात. रात्री आणि पहाटे मुलींना शिकवून सकाळी पुण्याला परतत. त्या काळी हिंगण्यापर्यंत प का रस्ता नव्हता. पावसाळ्यात तर चिखल तुडवत, वाटेतले ओढे पार करत जावे लागे. पाठीवर आश्रमासाठी लागणाऱ्या सामानाचे ओझे असे. त्यांचा सारा वेळ महाविद्यालय आणि आश्रम यातच जात असे. साहजिकच संसाराचा सारा भार बायावर पडे. अण्णांच्या कामाचे महत्त्व समजून घेऊन संसाराची सारी जबाबदारी बायाने उचलली. एवढेच नाही तर अनेक अनाथ, अपंग स्त्रियांना तिने



**जळो जळो स्वार्थाचे कुंपण, दुबळ्या आकाशांचे घरकुल। तुझ्यापरी हृदयात उठू दे, अखंड धडधड आणि तळमळ।।**



**अधिक जाणून घ्या : जानमी अमल** (१८९७-१९८४) - प्रसिद्ध वनस्पती शास्त्रज्ञ, पद्मश्री पुरस्कार प्राप्त

**प्रायोजक - श्री. संदीप जगधने, पुणे.**




आपल्या घरात आसरा दिला. हसतमुखाने त्यांची दुखणीखुपणी काढली. वेळोवेळी आश्रमाच्या कामासाठी मदत गोळा केली.

हळूहळू अण्णांच्या कामाचे महत्त्व लोकांना पटू लागले. बालविधवा नसलेल्या किंवा विवाहित वा कुमारिका असलेल्या मुलींनाही आश्रमात प्रवेश मिळावा आणि शिक्षणाची संधी मिळावी असा विचार समाजात रुजू लागला. आश्रमातल्या मुलींची संख्या हळूहळू वाढू लागली, तेव्हा १९०७ साली अण्णांनी महिला विद्यालय सुरू केले. 'आपल्या विद्यालयात शिकणाऱ्या मुलींनी फ त शिक्षित होऊ नये, तर सुशिक्षित व्हावे. आपल्या शिक्षणाचा उपयोग फ त अर्थार्जनासाठी न करता समाजोपयोगी कामासाठी करावा,' असे अण्णांना वाटत असे. त्यासाठी उद्यम विभाग, गृहविज्ञान, बागकाम, मैदानी खेळ, कवायत अशा अनेक गोष्टींचा समावेश त्यांनी अभ्यासक्रमात केला. मुलींना पोहणे शिकता यावे यासाठी शाळेत तलावाची सोय केली. आजच्या काळात 'या गोष्टींमध्ये विशेष असे काय?' असे कदाचित तुम्हां मुलांना वाटेल; पण त्या काळात मात्र, त्याची अपूर्वाई होती.

महिला विद्यालयामुळे अनेक मुलींना शालेय शिक्षणाचे मार्ग खुले झाले असले तरी स्त्री शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार अधिक जोमाने होण्यासाठी महिला विद्यापीठाची स्थापना करण्याची कल्पना अण्णांच्या मनात आली. त्याच्या उभारणीसाठी त्यांनी प्रचंड कष्ट घेतले. ३ जून १९१६ रोजी भारतातील पहिल्या महिला विद्यापीठाची स्थापना झाली. मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या महिला विद्यापीठाचे वेगळेपण जाणून म. गांधी, रविंद्रनाथ टागोर, ॲनी बेझंट यासारख्या मान्यवरांनी अण्णांच्या कामाचा गौरव केला. स्त्रियांना शिक्षिकेचे काम करण्याची संधी मिळावी म्हणून त्यांनी अध्यापिका विद्यालयाची स्थापना केली. १९३४ साली गांधीजींनी आश्रमाला भेट दिली. अस्पृश्यतेची प्रथा दूर करण्याच्या त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी अण्णांनी मागासवर्गीय मुलींना आपल्या संस्थेत प्रवेश दिला. १९३५ साली ग्रामीण विभागातील मुलामुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी 'महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ' ही संस्था काढली. संस्थेतर्फे अकरा वर्षात पन्नास शाळा चालवल्या.

स्त्री शिक्षणाचे महत्त्व सर्वांना कळावे आणि त्यासाठी मदत मिळावी यासाठी अण्णांनी सतत भारतभर भ्रमण केले. वयाच्या एकाहत्तराव्या वर्षी जेव्हा ते परदेशी गेले; तेव्हासुद्धा प्रेक्षणीय स्थळांना भेटी देण्याऐवजी शिक्षणसंस्थांना त्यांनी भेटी दिल्या. अमेरिकेतील बालगुन्हेगारांची शाळा, जपानमधील भूकंपाने उद्ध्वस्त झालेले आणि पुन्हा उभे राहिलेले महिला विद्यापीठ, पॅरिसमधील स्त्रियांचे वसतिगृह यांसारख्या संस्थांना भेट देणे अण्णांनी पसंत केले. जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट आइनस्टाईन, मादाम माँटेसरींची भेट घेतली. डेन्मार्क येथील शिक्षक मेळाव्यात ते सहभागी झाले.

सुरुवातीला स्त्री शिक्षणाला विरोध करणाऱ्या भारतीय समाजानेही स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटल्यावर अण्णांच्या कार्याला मदत केली.

अण्णांच्या कार्यासाठी अनेकांनी आर्थिक मदत देऊ कली. त्यांच्यावर कौतुकाचा आणि पुरस्कारांचा अक्षरश: वर्षाव केला. पुण्यातील ज्या रस्त्यावरून हातात झोळी घेऊन आश्रमासाठी वर्गणी गोळा



**पिढ्या पिढ्यांच्या निर्भय आम्ही, भारतीय भगिनी। घराघरांचे दुर्ग झुंजवू, झुंजू समरांगणी॥**



**अधिक जाणून घ्या: विजयालक्ष्मी पंडित** (१९०० – ९०)– मुत्सद्दी राजकारणी, पहिल्या महिला केंद्रीय मंत्री

**प्रायोजक - सौ. गीतांजली हेमंत जोशी, वाशी, नवी मुंबई.**



करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर पायपीट केली होती त्या रस्त्याला पुणे नगरपालिकेने ‘कर्वे रस्ता’ असे नाव देऊन त्यांच्या विषयीचा आदरभाव व्य त केला. त्यांच्या ऋषितुल्य कामामुळे आदराने त्यांच्या नावामागे महर्षी ही पदवी उत्स्फूर्तपणे जोडली जाऊ लागली. भारत सरकारनेही त्यांच्या कामाचे महत्त्व जाणून ‘भारतरत्न’ हा सर्वोच्च पुरस्कार त्यांना बहाल केला. कृतार्थ आयुष्य जगलेल्या अण्णांना १०६ वर्षांचे दीर्घायुष्य लाभले.

केवळ ७ मुली हाताशी घेऊन स्थापन केलेले ‘अनाथबालिकाश्रम ते महिला विद्यापीठ’ एवढा मोठा पल्ला ते गाठू शकले, ते त्यांची दुर्दम्य इच्छाश ती आणि नि:स्वार्थ वृत्ती यांमुळे! आज त्यांनी उभ्या केलेल्या संस्थेत सुमारे तीस हजार मुली शिकत आहेत. सुमारे तीन हजार मुली वसतिगृहात राहात आहेत. वाई, सातारा, रत्नागिरी, नागपूर येथे संस्थेच्या शाखा आहेत. ‘महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था’ हे अण्णांचे चिरंतन स्मारक आहे.

**– मृणालिनी चितळे**

गोपिकाश्रम, ७५९/३२ डे कन जिमखाना, पुणे 411004

**जरूर वाचा : महाराष्ट्राचे शिल्पकार महर्षी धोंडो केशव कर्वे**
**लेखक :** श्री. न. म. जोशी
**प्रकाशक :** महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई



# भिरभिरं



**– सुनील शिनखेडे**

***घरातील प्रत्येकाच्याच हाकेला ‘ओ’ देणाऱ्या, मदतीला धावून जाणाऱ्या ‘अष्टभुजा’ आईचा आपण सगळेचजण अनुभव घेतो. सोबतच्या लेखातल्या सोनानं मात्र, एका रविवारी आईसारखं ‘भिरभिरं’ होण्याचं ठरवलं... आणि फुलपाखरासारखं भिरभिरणं म्हणजे काय हेही तिला उमगलं.***

सकाळच्या गडबडीत सोनाच्या आईचा फोन वाजलाच म्हणून समजा. आजही तसंच झालं. आईनं तो धावपळ करत घेतलाही. नेहमीपेक्षा थोडंच बोलून आईनं फोन ठेवला. सोनाला आज बरंऽऽ वाटलं. जेव्हा आई फोनवर बोल बोल बोलते ना, तेव्हा सोनाला जाम कंटाळा येतो. आईला हे ठाऊक आहे. तरीही ती सोनाला म्हणते,

‘‘मला नाही हं नुसतंच ‘हा हूं’ करत बोलता येत. अगं, माणसांमध्ये राहतो, जगतो आपण. प्रत्येकाशी कसं रसाळपणे बोलावं.’’

‘‘रसाळपणे? म्हणजे गं किती? पाच-सहा किलो आमरस होईल इतकं की काय?’’ सोनाचे बाबा आईची अशी नेहमी फिरकी घेतात.

बोलताना आईदेखील स्वत:चे असे काही खास शब्द वापरते. ते शब्द सोनाला फार आवडतात. मंडईत भाजी आणायला गेली की आई म्हणते,

‘‘शुभ्र मुळा हवा. कोथिंबीर कशी हिरवीगाऽऽर हवी. चटकदार वांगी घ्यावीत म्हणजे भाजी छान होते..’’

मंडईला ती ‘मातीच्या लेकरांचं रंगसंमेलन’ म्हणते. आईला शब्दांचं वेड आहे, याचं सोनाला भारी नवल वाटतं. सोनाच्या लहानपणची एक आठवण आई नेहमी सांगते. नवनवे शब्द वापरायची सोनालाही हौस जडली; आईचं ऐकून ऐकून ! एकदा सोनानं शाळेत म्हटलं होतं म्हणे,

‘मला ना भेंडीची भाजी अजिबात आवडते.’ ‘अजिबात’ हा शब्द ‘नाही’ या क्रियापदाशी जोडलेला असतो, हे सोनाच्या तेव्हा लक्षात नव्हतं आलं.

सोनाची शाळा सकाळची असते. आई त्या वेळेला ‘युद्धवेळ’ म्हणते. प्रत्येकाला त्यावेळी घाई असते. बाबांची दाढी, अंघोळ. दादा नेहमीप्रमाणे उशीरा उठतो. त्याला दोन तांबे डो यावरून घ्यायचे असतात. आज्जीला



आई उन्हाची सावली, आई सुखाचे आगार। निळ्या आकाशाएवढा तिच्या मायेचा पदर।।

**अधिक जाणून घ्या : कमलादेवी चट्टोपाध्याय** (१९०३ – ८८)– भारतीय हस्तकला, लोककलेसाठी कार्य, पद्‌मविभूषण पुरस्कार



प्रायोजक - श्री. क्षेत्रपालेश्वर ट्रस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५

वाटतं, वडील माणसांचा मान प्रथम; तिला जाऊ द्यावं न्हाणीघरात पहिल्यांदा. सगळेजण आरडाओरड करत युद्ध खेळत असतात. सोनाची आई सकाळी 'अष्टभुजा' होते. दोन्ही मुलं, बाबा यांचा वेगवेगळा डबा, नाश्ता. मुलांचे गणवेष, बाबांचा डबा भरणे, आजीच्या देवपूजेची तयारी, दूधवाला, कचरावाला यांच्याशी दोन जिव्हाळ्याच्या शब्दांची देवघेव करणे इ.

घड्याळाकडे सारखी दृष्टी टाकत आई सांगत असते, 'काळ सरकतोय, तुम्ही त्याच्याही पुढे पळा.' आमची पळापळ पाहून आई हमखास एक वा य उच्चारते,

''माझं किनई भिरभिरं झालंय् अगदी.''

सोनाला आईच्या या 'भिरभिरं' शब्दाची खूप गंमत वाटते.

एकदा सोनानं आईला विचारलं,

''आई, भिरभिरं म्हणजे ती जत्रेत मिळते तशी रंगीबेरंगी भिंगरीच ना?'' आई म्हणाली,

''हो बाळा. तीच. वारा ज्या गतीत वाहतो त्या दिशेनं व गतीनं ती फिरते. कधी सावकाश-मंद तर कधी जलद, अति-जलद. वारा नसला की ती शांत असते. फिरताना तिचं रंग-रूप जेवढं गोड अन् सुंदर दिसतं ना तेवढं तिच्या रिकामपणात नाही दिसत.'' आईचं बोलणं सोनानं मन लावून ऐकलं अन् तिच्या मनात छोटा प्रकाशाचा दिवा लागला. त्या प्रकाशात तिला तिची आई खूप देखणी अन् तेजोमय वाटली. ती उठली, आईला जाऊन बिलगली.

सोना देवघरात देवाजवळ जाऊन म्हणाली,

''देवा, आज मला तू तुझ्या शाळेत जे शिकवतात ते शिकवलंस का रे? तू दिलेला गृहपाठ आता मी लगेच सोडवणार आहे. मी पास होईन हं तुझ्या परीक्षेत, बक्षीससुद्धा मिळवीन.'' सोनाचा चेहरा उजळला होता. तिनं मनाशी काही निश्चय केला होता.

एरवी दर रविवारी आईच्या हाकांकडे दुर्लक्ष करीत झोपून राहणारी सोना आज लवकर उठली. पटापट आवरून तयार झाली. चिडचिड न करता ती दूध प्यायली. मग बागेत गेली. जिथपर्यंत हात पोचतो तिथपर्यंतची फुलं तोडली. प्राज ताची फुलं गोळा केली. आईला खूप आवडतात ना ही फुलं! आई कधीकधी लाडानं सोनाला 'प्राज ता' म्हणते. 'टपटपणारं झाड माझं ते' म्हणून तिला जवळ घेते. सोनानं तुळशीदल, दुर्वा तोडल्या अन् फुलांसह आजीला देवघरात नेऊन दिल्या. आजीला प्रेमाचं भरतं आलं. ''अग्गोबाई ! स काळी केवढं *सरप्राइज* दिलंय सोनानं.'' आजीचे कौतुकोद्‌गार ऐकून सोनाला वाटलं, 'आईसाठी का नसतात हे शब्द? ती तर रोज फुलं आणून देते. सुईत दोरा ओवून देते. कधी हारसुद्धा करते.'



सोना स्वत:च्या खोलीत गेली. तिचा, दादाचा पसारा तिनं आवरून टाकला. पांघरुणाची घडी केली. गणवेष, मोजे धुवायला टाकले. ती स्वयंपाकघरात गेली तर आई इडल्या करीत होती. ''आई मी ताटल्या पुसून देऊ?'' ती म्हणाली. आईनं आश्चर्ययु त आनंदानं तिच्याकडे बघितलं.

''नको, नको. तू छान गरमगरम खा आधी,'' आई लाडानं म्हणाली. तित यात फोन वाजला. फोनची रिंग वाजली की कुणी स्वत:हून फोन घेतच नाही; सगळे आईचीच वाट बघतात. सोना धावली आणि तिने फोन घेतला. तो बाबांच्या मित्राचा होता. आता बाबा अर्धा तास तरी बोलणार. बाबांचा तर काय रविवार आहे ना ! सुट्टी !! ते मनसो त पेपर वाचणार. अन् स्वयंपाकातील नव्या पदार्थांची आईला फर्माइश करणार. आईसुद्धा उत्साहानं सगळं करते. सोनाला वाटलं, आपली आई *ग्रेट* आहे. घरात सर्व कामं करते. गाडी चालवते. बँक, बिलं, भाजी, किराणा सर्व बाहेरचे व्याप सांभाळते. शिवाय आजीचं *मेडिकल चेकअप*, तिची औषधं याकडे बघते. पाहुणे आले की आईची सरबराई तर विचारूच नका. ती खरंच एक रंगीत उत्साही भिरभिरं आहे.

आईच्या लक्षात आलं आज सोनाचा वेगळाच मूड आहे. ती

**आई असते एक धागा, वातीला उजेड दावणारी समईतील जागा ।।**

**अधिक जाणून घ्या : सुभद्राकुमारी चौहान** (१९०४-४८)- प्रसिद्ध हिंदी कवयित्री, अनेक देशभ तीपर कविता प्रसिद्ध

**प्रायोजक -डॉ. संदीप श्रोत्री, सातारा.**



मोठ्ठी झालीय. हळवी, रडूबाईसुद्धा. नेहमी रुसून हट्ट करणारी आमची वेडाबाई हरवली कुठे?

''सोना, इकडे ये.''

''काय आई?'' आईनं सोनाला जवळ घेतलं. तिची प्रेमळ सायीसारखी मऊ बोटं सोनाच्या पाठीवरून फिरू लागली.

''खारूताई, आज काय चाललंय तुमचं? माझ्या कामात इवला इवला वाटा का उचलताय तुम्ही?'' आई म्हणाली.

''अगं, मी आज तुझं छोटं भिरभिरं झालेय. रोज आम्ही तुला वाऱ्यासारखं इकडे तिकडे फिरवतो. पण तू म्हणशील तसं वागणार मी आजपासून. तसं मी देवाला वचनही दिलंय बरं का !''

आई तिला जवळ घेऊन म्हणाली,

''तू आहेसच माझं भिरभिरं. परंतु भिंगरी नाही हं ! भिरभिरं अजून कुणाला म्हणतात माहितेय? फुलपाखराला. रंगीबेरंगी नाजूक फुलपाखरूसुद्धा भिरभिरंच असतं. ते निसर्गाचं मोठं काम करतं. फुलामधला मध टिपतं आणि परागीभवन करतं. त्यामुळं पुन्हा निसर्ग फुलतो, फळतो, बहरतो. चांगल्या गोष्टी टिपून घेणारं तूही एक 'फुलपाखरू' आहेस बाळा. आपल्या घरामधली सुगंधी झुळूक आहेस तू. असंच भिरभिरत राहो माझं बाळ, हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.''

आईनं डोळ्यातलं पाणी पुसलं. सोना पुन्हा लहान होऊन आईला बिलगली.

*'छान किती दिसते फुलपाखरू...'*

आई ही कविता गुणगुणत घरात भिरभिरू लागली अन् सोनाला खूप मस्त वाटलं. घर गोड सुगंधानं भरून गेलं.


**– सुनील शिनखेडे**
कार्यकारी अधिकारी,
अतिरि त महानिर्देशक (प. क्षेत्र),
आकाशवाणी, बॅक बे रि लेमेशन,
चर्चगेट, मुंबई 400020




**माझी प्रेममय आई, जसे चंदनाचे खोड। सर्वांसाठी झिजण्याचे, तिला सदाचेच वेड।।**

**अधिक जाणून घ्या : रु मिणीदेवी अरुंदळे** (१९०४ – ८६) – भारतीय शास्त्रीय नृत्य पारंगत




**प्रायोजक - प्रतिभा इले ट्रिकल्स, पुणे.**

# चित्त जेथे भयशून्य... उंच जिथे माथा...!

**– डॉ. अनघा लवळेकर**





वीरकर सर अत्यंत तन्मय होऊन कविता शिकवत होते. रवींद्रनाथ टागोरांची अजरामर कविता

*'Where the mind is without fear*
*and the head is held high...*
*Into that heaven of freedom my father,*
*Let my country awake!'*

रवींद्रनाथांचे सुंदर, मनाला स्पर्श करणारे शब्द आणि सरांचं जीव ओतून त्याचा अर्थ सांगणं, यामुळे सगळा दहावीचा वर्ग अगदी गुंग झाला होता. कवितेचा शेवटचा चरण समजावून सांगितल्यावर सर म्हणाले, ''आता या सुंदर कवितेचा आपल्या आयुष्याशी काय संबंध आहे ते शोधूया..! सगळ्यांनीच जरा *'Heaven of freedom'* म्हणजेच स्वत:ला 'स्वातंत्र्याचा खरा स्वर्ग' कशात दिसतो, ते आपापल्या वहीत लिहा. तुम्हाला प्रत्येकाला वेगवेगळं वाटू शकतं; त्यामुळे उत्तरं वेगवेगळीच येणार, हे लक्षात ठेवा.''

सगळ्यांच्या लेखण्या कुरकुरू लागल्या. सरांनी वर्गावर नजर फिरवली. त्यांना दिसलं, की बेला एकटीच काही न लिहिता हातावर हात ठेवून शांतपणे बसली होती. सरांना आश्चर्य वाटलं. एरवी कुठल्याही वेळी उत्तर द्यायला, शंका विचारायला पुढे असलेली बेला; आता गप्प कशी? त्यांनी जवळ जाऊन तिला विचारलं, ''का गं बेला, तू का नाही लिहीत?'' बघता बघता बेलाचे डोळे भरून आले. ती दाटलेल्या गळ्यानं म्हणाली, ''पण सर, नुसतं लिहून काय उपयोग? जर तो स्वर्ग, ते स्वातंत्र्य, तो निर्धास्तपणा कधी मिळणारच नसेल, तर कशाला हे सगळं खरडायचं? आणि ती हमसाहमशी रडायला लागली.

सर चकित झाले; पण शांत स्वरात म्हणाले, ''तू कुठल्या स्वातंत्र्याबद्दल बोलतीयेस? कसला निर्धास्तपणा मिळत नाहीये ते सांगशील का?'' तेव्हा हळूच डोळे पुसून बेला म्हणाली, ''सर, मी खूप लांब राहाते. मला दोन बसेस बदलून घरी जावं लागतं. संध्याकाळी शाळा सुटल्यावर जर जादा *क्लास* असेल, तर मला पोचायला आठ वाजून जातात. आमच्या गल्लीमध्ये तोपर्यंत अगदी शांतता झालेली असते; पण काही टवाळ मुलं ना यावर टपरीपाशी उभी असतात. ती रोज माझ्याकडे बघून काहीतरी बोलतात. *कॉमेंट्स* करतात. इतके दिवस मी त्यांच्याकडे लक्ष देत नव्हते; पण काल त्यातला एकजण मधेच येऊन उभा राहिला. मला खूप *टेन्शन* आलं, सर. पायच लटपटायला लागले. मी कशी तरी सटकून घरी पोचले. पण आज खूप भीती वाटतीये सर. सारखी दिल्लीतल्या 'त्या' प्रसंगाची आठवण येते. आपल्याला कुणी 'असा' त्रास दिला तर... या कल्पनेनंच गळायला झालंय. साधा रस्त्यानं घरी जाताना निर्धास्त वाटत नाही मला. कसल्या स्वातंत्र्याबद्दल लिहू मी?''

बेलाच्या भरभरून बोलण्यावर सगळा वर्ग स्तब्ध झाला. सगळ्या मुली एकदम सुन्न झाल्यासारख्या झाल्या. मुलांमध्ये कुजबूज सुरू झाली. सरांच्या लक्षात आलं, 'आत्ता या प्रश्नाची तड लावलीच पाहिजे.' ते म्हणाले, ''बेला, तुझा प्रश्न अगदी योग्य आहे; पण याबद्दल सगळ्यांना काय वाटतंय ते आपण समजून घेऊया. तुम्ही आता लहान नाही. पुढच्या वर्षी महाविद्यालयात जाल. अजून दोन वर्षांनी तर तुम्हाला मतदानाचा ह कही मिळेल. तेव्हा तुम्ही अशा घटनांवर विचार करायलाच हवा. तुम्ही वृत्तपत्र, टी. व्ही. सगळ्यांमधून काही ना काही वाचलं – ऐकलं असेलच. काय वाटतं तुम्हाला अशा घटनांबद्दल?''





'भयंकर', 'खूपच सिरीयस गोष्ट आहे सर', 'लोक असं वागूच कसं शकतात?' 'त्यात म्हणे एक आमच्या एवढा मुलगा पण होता!'; 'अशा लोकांना भर चौकात फाशीच द्यायला पाहिजे!', 'सर, एक घटना एवढी गाजली पण रोजच अशा बातम्या येत असतात..' सगळ्या बाजूंनी प्रतिक्रियांचा पाऊस पडला.

''पण मुळात अशाप्रकारे एखाद्या स्त्रीला वागवणं यामागे काय कारण असेल?'' निधीनं मोठ्यानं विचारलं. त्यावर ऋता उठून उभी राहिली. ''माझी आई अशा प्रकारच्या खूप जणींना वकील म्हणून मदत करते. ती म्हणते, 'मुळात बाई ही आपल्यापेक्षा कायम कमी दर्जाची आहे, तिला कसंही वागवलं तरी चालेल, तो आपला ह कच आहे असं बहुसंख्य पुरुषांना वाटत असतं.' 'निर्भयाला' भोगावा लागलेला त्रासही अशाच प्रकारच्या लोकांमुळे असणार.''

''नुसतं तेवढंच नाही, तर नंतर तिनं तक्रार करू नये म्हणून तर तिला इतकं क्रूरपणे वागवलं. पण तरीही तिनं केवढी झुंज दिली ! मला तर तिच्या धाडसाला सलाम करावासा वाटतो,'' पंकज चर्चेत भाग घेत म्हणाला.

''पण तरीही त्या सगळ्या लोकांना कायमचा धडा बसेल अशी शिक्षा झाली का? त्यातला एक जण तर काही महिन्यांनी सज्ञान होणार होता म्हणून मोठ्या शिक्षेतून सुटला म्हणे. असला कसला न्याय? लहान वय म्हणून त्याचा गुन्हा पण लहान का? त्याला का म्हणून कडक शिक्षा केली नाही?''

''म्हणून तर सगळा देश निर्भयाच्या मागे उभा राहिला ना! त्यामुळे निदान अशा लोकांना थोडा तरी चाप बसेल, असे कायदे झाले,'' ऋतानं सांगितलं.

''पण सर, मला एक शंका आहे,'' विनय मध्येच म्हणाला, ''मध्ये ती कुठल्यातरी टी. व्ही. चॅनेलवाल्याची केस झाली ना. त्यात ती जी तक्रार करणारी मुलगी होतीना, तिच्याबद्दल काही लोक म्हणत होते की, तीच आधी वागायला चुकली म्हणून सगळं पुढचं रामायण झालं. हे खरं असेल का हो?''

''अशा गोष्टी कधी १००% चूक किंवा बरोबर अशा पद्धतीनं बघता येत नाहीत विनय.'' सर म्हणाले, ''आता बेलाचीच भीती बघा नं. ती सर्व काळजी घेऊन, सरळ मार्गानं जाणारी असूनही तिला त्रास होतोच आहे ना? आणि कधी एखाद्या मुलीचं सुरुवातीला जरा काही चुकलं तर त्यामुळे तिला 'असा' त्रास द्यायचा कुणाला अधिकार मिळाला, असं होतं का? जी वृत्ती चुकीची आणि कायद्याच्या दृष्टीनं गुन्हा आहे, ती गुन्हाच म्हणायला हवी. त्याची कुठल्याच कारणानं भलावण करणं योग्य नाही. कितीतरी बातम्या आपण अशाही वाचतो की ज्यात अगदी अजाण, निर्दोष मुलींना, स्त्रियांनाही निर्भयासारखं बळी जावं लागतं.''

''हो सर. पण तरीसुद्धा अशी शंका येतेच ना की, सारखे सारखे मुलींच्याच बाजूनी कायदे का होतात? एखाद्या मुलाला जर कुणी उगीचच त्रास द्यायचा ठरवून असे आरोप केले तर? त्या एका मंत्र्यांनी नाही का म्हटलं मध्ये की मला आता *पी. ए.* म्हणून सुद्धा एखाद्या बाईला नेमायची भीती वाटते!'' संकेत मध्येच म्हणाला.

''हे म्हणजे 'उल्टा चोर कोतवाल को डाँटे' सारखंच झालं !'' निधी उसळलीच. ''कधीतरी असा अपवाद घडतो म्हणून काय त्यावरनं नियम बनवायचे का सर? सर्वसाधारणपणे असला त्रास मुलींनाच होतो ना? तोंड दाबून बु यांचा मार असतो. म्हणजे त्रास देणारे दुसरेच आणि लोक म्हणतात मुलीच नीट वागत नाही म्हणून!''

''अगं हो-हो निधी याला दोन्ही बाजू आहेत हे खरं; पण आत्ताची माहिती दाखवते की मुलींवर जास्त अन्याय होतो म्हणून. त्यासाठीच तर सरकारनं 'विशाखा समिती' ची स ती केलीय सगळ्या सरकारी आणि गैरसरकारी संस्थांना ! कामावर किंवा शिकत असताना जर एखाद्या मुलीला कुणी थोडा जरी असा त्रास देतंय असं वाटलं तर



जात पात ना आम्ही मानत, धर्मभेद ना आम्ही जाणत। तेज आमुच्या हृदयामधले काळोखावर पडू दे ।।



**अधिक जाणून घ्या: देविकारानी** (१९०८-९४) - भारतीय रजतपटाची पहिली नायिका, पद्मश्री व दादासाहेब फाळके पुरस्कार

**प्रायोजक - संतुल, (श्री. मिलिंद संत), पुणे.**

ती त्या समितीकडे थेट दाद मागू शकते. माहीत आहे ना?'' सरांनी मध्य गाठत म्हटलं.

''पण सर, निर्भयासारख्या घटनेत किंवा अशाप्रकारे त्रास होणाऱ्या मुलींनी नेहमी घाबरूनच राहायचं का मग? मला त्या मुलांची भीतीच वाटत राहाणार का कायम?'' जिच्यामुळे चर्चेला मूळ सुरुवात झाली, त्या बेलानं आपली कैफियत पुन्हा मांडली.

''अजिबात नाही ! '' सर ठाम आवाजात म्हणाले. ''का म्हणून घाबरायचं तुम्ही? तुम्ही घाबरताय असं दिसलं तर ते अजूनच शेफारतील. ताठ मान ठेवून त्यांच्या समोरून जायला पाहिजे. वेडीवाकडी थट्टा केली तर जाब विचारायचं धाडस कमवायला पाहिजे. मुळात कायदा आपल्या बाजूचा आहे आणि वेळप्रसंगी आवाज चढवला तर लोकही आपल्या बाजूनेच उभे राहातील यावर विश्वास पाहिजे. त्यासाठी आपली मनाची आणि शरीराची दोन्ही क्षमता वाढवायला हवी. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे जिला त्रास होतो; तिला स्वत:कडे दोष घेण्याचं काहीच कारण नाही. हे अगदी मनात ठसवायलाच हवं. कधी हाताबाहेर त्रास जातोय असं वाटलं तर आपल्या जवळच्या मोठ्या व्य तीची मदतही घ्यायला हवी. मुख्य म्हणजे मनात न ठेवता बोलून टाकायला हवं,'' सरांचं स्पष्टीकरण.

''आणि सर आमच्यासारख्या मित्र-मैत्रिणींनी भ कमपणे तिला पाठिंबा द्यायला हवा, हो ना?'' विनय एकदम म्हणाला !

''अगदी बरोबर. तुमचा *सपोर्ट* असेल तर मग तिलाही निर्धास्त वाटेल ना?'' सरांनी हसून म्हटलं.

''ठरलं तर मग ! बेला, तुला आमचा *फूल टू सपोर्ट* आहे. बघतोच तुला कोण त्रास देतंय ते. जर त्यांनी त्रास देणं थांबवलं नाही तर आम्ही सगळे मिळून समाचार घेऊ त्यांचा! हो ना रे?'' संकेत उठून मूठ आपटत म्हणाला. ''होऽऽ!'' सगळ्या वर्गानं दणाणून उत्तर दिलं.

''मला तुमचा अभिमान वाटतो;'' सर हसून म्हणाले, ''आजच्या कवितेचा अर्थ तुम्ही खरा करणार अशी माझी खात्री आहे. हो ना-?

***'चित्त जेथे भयशून्य... उंच जिथे माथा...'***

तुमच्यासारखा विचार सगळी तरूण मुलं-मुली



करायला लागले तर पुन्हा 'निर्भया'चा असा बळी कुठेच, कधीच जाणार नाही !''

सरांचे शब्द आणि बेलाचं समाधान एकाच वेळी वर्गातल्या सगळ्यांच्या चेहऱ्यावर दिसलं.

**- डॉ. अनघा लवळेकर**
ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे - ३०

**प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बु स ॲ ट**
**अधिनियम ११ बी अन्वये प्रसिद्ध करावयाची माहिती**
**अर्ज क्र. ४ (नियम ८ प्रमाणे)**

| | | |
|---|---|---|
| **वृत्तपत्राचे नाव** | **:** | **छात्र प्रबोधन** |
| **प्रसिद्धी काळ** | **:** | **मासिक** |
| **संपादक, प्रकाशक व मुद्रकाचे नाव व पत्ता** | **:** | **प्रा. महेन्द्र सेठिया, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०** |
| **राष्ट्रीयत्व** | **:** | **भारतीय** |
| **मासिकाची मालकी** | **:** | **ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०** |

**मी महेन्द्र सेठिया असे जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे.**

**पुणे**
**सौर १० फाल्गुन शके १९३५**
**(१ मार्च २०१४)**

**(महेन्द्र सेठिया)**
**संपादक, छात्र प्रबोधन**



आज नाही मी एकटी, मला मिळाल्यात सख्या। रोज एकमेळ करू, नाही राहणार मु या।।

**अधिक जाणून घ्या: दुर्गाबाई देशमुख** (१९०९ - ८१) - महिला साक्षरता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य, पद्मभूषण पुरस्कार

**प्रायोजक - सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे.**



# ती...

ती...
माझी बहीण
खुशाल घाबरू शकते झुरळाला,
त्याचं सगळ्यांना कौतुक
आणि मी पोहण्यासाठी
पाण्यात उडी घ्यायला घाबरलो तरी
हसतात सगळी... ऐकावं लागतं मला
'घाबरतोस कसला
मुलगा ना तू... !'

ती...
माझी बहीण
कुणी जरा जोरात बोललं,
तरी लागते मुळुमुळु रडायला
की बाबा लगेच जवळ घेतात
तिच्या रडण्याचंही कौतुक...
आणि मी जोरात आपटलो
तरी रडायचं नाही
'मुलगा ना मी..!'

मग मी रडू दाबून ठेवतो
मग मला खूप राग येतो
मग मी फेकाफेकी करतो
आरडा ओरडा करतो...
तर सगळी म्हणतात
'ती बघ कशी शांत... शहाणी...
नाहीतर तू...!'

तिला सहज मिळेल हवा तिथे प्रवेश
मला मिळवावे लागतील ९९% मार्कस्
'मुलगा ना मी..!'




– आसावरी काकडे,
'सेतू', डी – १/३ स्टेट बँकनगर, कर्वेनगर, पुणे 411052

**आम्ही कॉपी करणार नाही... कॉपीविरोधी अभियान**

'मी कॉपी करणार नाही आणि इतर कोणाला कॉपी करू देणार नाही.'

मान्यवरांचे संदेश वाचा मलपृष्ठाच्या आतील पानावर...



अधिक जाणून घ्या : अरुणा असफअली (१९०९ – ९६) स्वातंत्र्य सेनानी, भारतरत्न पुरस्कार प्राप्त

प्रायोजक - डॉ. संतोष काकडे, नागपूर.



# खरे बक्षीस

– सुनेत्रा नकाते

***मेघदूतच्या स्वप्नात एकलव्याची गोष्ट साकार झाली. गोष्टीमधले गुरू द्रोणाचार्य, पांडव, कौरव सर्वजण त्याच्यापुढे उभे ठाकले. मग भर दुपारी त्याला हुडहुडी भरली. त्याला वाटले, 'हे चष्मावाले सर गुरू द्रोणांचा अवतार तर नाहीत?' दुसरा दिवस उजाडला... गुरुदक्षिणा देण्याऐवजी 'मेघदूत'ला मोठ्ठं बक्षीसच मिळालं... आपली गुरुदक्षिणा त्याला भविष्यात चुकती करायची होती...***

चिंचपिंपळी नावाचे एक गाव होते. त्या गावात पूर्वी चिंचेची व पिंपळाची खूप झाडे होती. म्हणून त्या ग्रामनगराचं नाव 'चिंचपिंपळी' असं पडलं होतं.

गावदेवाच्या देवळाजवळील उद्यानात फाटकाजवळच्या एका झोपडीत बिजलीबाई नावाच्या एक बाई राहायच्या. त्यांना मेघदूत नावाचा एक मुलगा होता. मेघदूतचे वडील मेघदूत आईच्या पोटात असतानाच देवाघरी गेले होते. त्यामुळे मेघदूतला त्याच्या आईने एकटीनेच कष्ट करून वाढवले होते. बिजलीबाई उद्यानातल्या झाडांना पाणी व खते घालणे, तण उपटणे, कीटकनाशकांची फवारणी करणे अशी कामं करत. त्या कामाबद्दल ग्रामपालिका त्यांना दर महिन्याला नियमित वेतन देत असे.

सातवीची वार्षिक परीक्षा संपली आणि मेघदूतच्या शाळेला दोन महिने सुट्टी मिळाली. वर्गातली इतर मुले या सुट्टीत नातेवाईकांच्या गावी जात किंवा एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी सहलीला जात. कोणी वेगवेगळ्या लासना किंवा मग आणखीन कसल्या कसल्या शिबिरांना जात.

मेघदूतला यापैकी काहीच करता येत नसे; कारण नातेवाईकांकडे जावं म्हटलं तर त्याला कोणी नातेवाईकच नव्हते. कुठल्यातरी लासला किंवा शिबिराला जावं म्हटलं तर त्यांची फी भरण्याइतके पैसे त्याच्याकडे नसायचे. खरंतर तो खूप हुशार होता.

शाळेच्या शेवटच्या दिवशी मेघदूत जेव्हा शाळेतून घरी आला तेव्हा उद्यानातल्या सभागृहाजवळ गर्दी दिसली म्हणून तो तिकडे गेला. त्याला कळले की, तेथे कसलातरी उद्घाटन समारंभ चालू आहे. त्यानं मग तिथल्या सुपरवायझर डिसोझा यांच्याकडे चौकशी केली, तेव्हा ते म्हणाले की,

''सुट्टीतील दोन महिने येथे संगणक शिबिर आहे. काही मुलांनी एक हजार रुपये फी भरून आजच प्रवेश घेतला आहे. तुला पण यायचे आहे का शिबिराला?'' त्यावर मेघदूत म्हणाला, ''हो, यायचे तर आहे मला, पण फी...''

''अरे, ते सर माझ्या ओळखीचे आहेत. मी बोलेन त्यांच्याशी तुझ्या फीबद्दल ! मी सांगेन की, याची फी माफ करा कारण याची आई खूप गरीब आहे.''

डिसोझा सुपरवायझर यांचं



**गुढीपाडवा दिवस सणांचा, आनंदाचा, उत्साहाचा। नव वर्षाचा, नव आशांचा नव्या नव्या शुभ संकल्पांचा।।**

**अधिक जाणून घ्या : मृदुला साराभाई** (१९११–७४) – स्वातंत्र्य सेनानी व महिलांच्या ह क व अधिकारासाठी लढा

**प्रायोजक - व्ही. व्ही. आर्किटे ट प्रा. लि., पुणे.**

असलं बोलणं ऐकून मेघदूत खूप खूप रागावला; पण मनातल्या मनात! मनातल्या मनातच तो म्हणाला, ‘अरे हट ! माझी आई मुळीच गरीब नाही. हां, आता तिच्याकडे खूप पैसे नाहीत, हे खरे पण... ’

‘गरीब-श्रीमंत हा भेद जवळ पैसा किती आहे यापेक्षा तुमच्या गुणांवर ठरतो;’ असं त्याच्या आईनंच त्याला सांगितलं होतं.

मग तो पाय ओढत ओढत घरी आला. त्याची आई घरी आली होती. त्याला पाहून ती म्हणाली,

‘‘आलास का मेघा? मी यावेळी मला मिळालेल्या *ओव्हर टाईमच्या* पैशातून तुला दोन जोड नवीन कपडे आणले आहेत. घालून बघ बरं बसतात का ते!’’ कपडे पाहून मेघदूतला खूप आनंद झाला. मग मेघदूतने आईला कपडे घालून दाखविले. आई त्याच्याकडे अगदी कौतुकानं पाहात म्हणाली,

‘‘अगदी साहेबासारखा रुबाबदार दिसतोय माझा सोन्या !’’

मेघदूत मग भलताच खूष झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी तो उद्यानात आला. सभागृहाच्या पार्कींगमध्ये खूप सायकली रांगेने लावल्या होत्या. आतल्या हॉलमध्ये छोट्या-छोट्या टेबलांवर संगणक ठेवले होते व त्यासमोरील खुर्च्यांमध्ये मुले बसली होती. मेघदूत मग मंच्याजवळ असणाऱ्या खिडकीपाशी गेला. त्या खिडकीतून त्याला फळ्यावरची संगणकाची आकृती, चष्मावाले सर आणि त्यांच्या समोरच्या टेबलावरचा संगणक अगदी स्पष्ट दिसत होता आणि सरांचं बोलणंही अगदी स्पष्ट ऐकू येत होतं. सर बोलत होते,

‘‘आज इथे जमलेल्या शिबिरार्थी छात्रांनी मी जे-जे काही सांगेन ते-ते लक्षपूर्वक ऐकायचे, पाहायचे आहे.’’

मेघदूत खिडकीबाहेर उभा राहून सरांचं बोलणं अगदी तन्मयतेनं ऐकत होता व पाहातही होता. त्याची तर अगदी ब्रह्मानंदी टाळी लागली होती. म्हणूनच सरांचे *लेक्चर* ऐकताना वेळ कसा गेला; हे त्याला कळलंच नाही.

सर वर्गाबाहेर पडताच मेघदूत खिडकीजवळून दारापाशी आला. त्याला घुटमळताना पाहून सरांनी डिसोझाला विचारलं,

‘‘अरे डिसोझा, हा पोरगा कोण रे?’’ तेव्हा डिसोझा म्हणाले,

‘‘उद्यानाच्या *गेटजवळच्या* झोपडीत राहणाऱ्या बिजलीबाईंचा हा मुलगा आहे. मेघदूत त्याचं नाव!’’

मेघदूतकडे वळत सर म्हणाले,

‘‘काय मेघदूत, आता सुट्टीत कोणाच्या गावाला जाणार? मामीच्या की आत्त्याच्या? ’’

‘‘नाही सर, मला कोणी नातेवाईकच नाहीत.’’

हे ऐकताच सर म्हणाले,

‘‘मेघदूत, तुला जर या दोन महिन्यात काही काम करायची इच्छा असेल, तर मी तुला काम देऊ शकतो. तुला त्यासाठी वेतन पण देऊ आम्ही.’’

वेतन हा शब्द ऐकताच मेघदूतचे डोळे एकदम चकाकले व तो म्हणाला,

‘‘वेतन? म्हणजे पैसे? किती पैसे द्याल तुम्ही मला तुमच्या कामाचे?’’

‘‘उद्यापासून सकाळी दोन-अडीच तास काम करावं लागेल तुला ! दोन महिन्यानंतर तुझे काम बघून मी तुला वेतन देईन; चालेल का?’’

‘‘चालेल, चालेल, खूपच चालेल !’’ मेघदूत आनंदून म्हणाला.

दुसऱ्या दिवशी मेघदूत नीटनेटका तयार होऊन सकाळी साडेसातलाच वर्गापाशी हजर झाला. डिसोझांनी त्याला त्याच्या कामाचं स्वरूप समजावून सांगितल्यावर, त्यानं कामाला सुरुवात केली.

सर्वप्रथम त्यानं सभागृह झाडून साफ केलं, फळा पुसला, सर्व संगणकावरची धूळ झटकण्यानं झटकून काढली.

मग एकेकजण यायला सुरुवात झाली. मेघदूतनं नोंदणी वहीतील छात्रांची नावे पाहून, येणाऱ्या प्रत्येक छात्राची, त्या दिवसाची हजेरी नोंदवली. बरोबर आठ वाजता सर वर्गात येताच तो वर्गाबाहेर पडला. सभागृहाचे दार बाहेरून ओढून तो व्हरांड्यातून मंच्याजवळच्या खिडकीत जाऊन



वठलेल्या वृक्षांसाठी, ध्यास एक फुलण्याचा। आठवीत सुख-वैभव, ऋतु वसंत येण्याचा।।

**अधिक जाणून घ्या : प्रितीलता वड्डेदार** (१९११-३२) - भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सशस्त्र सहभाग

**प्रायोजक - श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे.**

उभा राहिला.

सर जे काही बोलत होते, लिहित होते, संगणकावर प्रात्यक्षिक करून दाखवत होते, ते सर्व तो मन लावून पाहात होता, ग्रहण करत होता. मुले वर्गाबाहेर पडताच कुलूप लावून किल्ली डिसोझाकाकांकडे देऊन तो घरी आला. त्या रात्री तो झोपेपर्यंत अगदी नाचत, बागडत आणि उडतच होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी १५-२० मिनिटे आधीच तो वर्गाकडे निघाला. तर डिसोझाकाका कुलूप उघडून बाहेरच्या बाकड्यावर बसले होते. मेघदूतनं त्यांना विचारलं,

''काका मी जरावेळ त्या शेवटच्या बाकावरच्या संगणकावर काम करू का? तो ज्यादा आहे बहुतेक.''

''जा, जा, काय काम करायचं ते कर, पण जपून वापर ! काही खराब झालं तर सर मलाच रागावतील,'' डिसोझाकाका म्हणाले. डिसोझाकाकांची परवानगी मिळताच मेघदूतचा आनंद गगनात मावेना.

त्यानं आत जाऊन झाडझूड, सफाई केली व शेवटच्या बाकावरच्या संगणकावर काल सरांनी दाखवलेली प्रात्यक्षिकं करून पाहिली आणि त्या सर्वांची वहीत टिपणेपण काढली.

कालच्याप्रमाणेच वर्गाला सुरुवात होताच त्यानं खिडकीबाहेर उभे राहून मन लावून *लेक्चर* ऐकलं.

दिवसेंदिवस त्याची प्रगती होऊ लागली होती. बघता बघता दोन महिने संपले. शिबिराची सांगता करण्यापूर्वी शिबिरार्थी छात्रांची संगणकपरीक्षा घेणं सरांना आवश्यक वाटत होतं. त्यांनी परीक्षेसाठी दिवस व वेळ निश्चित करून डिसोझा व मेघदूतला सर्व सूचना दिल्या.

ठरलेल्या दिवशी सकाळी सर्व मुले हजर झाली. मेघदूतनं सर्व तयारी उत्तम करून ठेवलेलीच होती.

मेघदूत सरांजवळ गेला आणि त्यानं सरांना विचारलं, ''सर, मलापण परीक्षा द्यायचीय, मला परवानगी द्याल?''

''तुला खरोखरच मनापासून परीक्षा द्यावीशी वाटते?''

''हो ! खरंच द्यायची आहे मला परीक्षा !''

थोडा वेळ विचार करून ते परत म्हणाले,

''तो शेवटच्या बाकावरचा संगणक तू परीक्षेसाठी वापरू शकतोस. पण...?''

''पण काय सर? तुम्ही परीक्षा फीबद्दल म्हणत असाल, तर मी आजच फीपण भरेन. तुम्ही मला जे वेतन देणार आहात त्यात फीचे भागेल ना सर?''

मेघदूतचे बोलणे ऐकून सरांनी त्याच्याकडे थोडंसं रोखून पाहत त्याला सांगितलं,

''बाळा, इकडे येवून या नोंदवहीत तुझे पूर्ण नाव लिही बघू.''

मेघदूतनं नोंदवहीतल्या सर्वात शेवटच्या नावाखाली स्वत:चे पूर्ण नाव लिहिले. मेघदूतनेही इतर मुलांबरोबर परीक्षा दिली. परीक्षा संपल्यानंतर सरांनी सर्वांना सांगितलं,

''तुमचा परीक्षेचा निकाल न्यायला उद्या तुम्ही सर्वांनी परत येथे यायचे आहे. महत्त्वाचे म्हणजे उद्या तुम्हा सर्वांकडून मला गुरुदक्षिणापण हवी आहे.''

'गुरुदक्षिणा' हा शब्द ऐकून सर्वांनी एकच गलका केला. ''सर, सांगा ना, तुम्ही म्हणाल ती गुरुदक्षिणा आम्ही देऊ...''

''मला जे पाहिजे आहे ते मी तुम्हाला उद्याच सांगेन,'' सर हसत म्हणाले.

''मेघदूत, गुरुदक्षिणेचं तेवढं प कं लक्षात असू दे !''

मेघदूत घरी आला, तरी त्याच्या मनात 'गुरुदक्षिणा' शब्द सारखा घोळत होता. 'आपण काय देणार गुरुदक्षिणा?' तो विचारात पडला.

विचार करत करतच त्यानं जेवण केलं. मग तो उद्यानात इकडे-तिकडे भटकत राहिला. थोडावेळ घसरगुंडीवरून घसर घसर घसरला. त्याचाही कंटाळा आल्यावर आंब्याच्या झाडाखाली जाऊन निवांत पडून राहिला.

त्याचे डोळे कधी मिटले हे त्याला कळलंच नाही. झोपेत त्याला स्वप्न दिसलं. त्या स्वप्नात, खांद्याला धनुष्य अडकविलेला व पाठीच्या भात्यात खूप बाण



आनंदाने घर हे झुलते, तोरण लेवून दारी। मांगल्याला साद घालते, रंगांची ही उधळण न्यारी॥

**अधिक जाणून घ्या: कॅप्टन लक्ष्मी सेहेगल** (१९१४-२०१२) - आझाद हिंद सेनेतील राणी लक्ष्मी रेजिमेंट कमांडर, पद्मविभूषण पुरस्कार



**प्रायोजक - कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे.**



असलेला छोटा मुलगा त्याला दिसला. त्या मुलानं एका दाढीवाल्या ऋषींच्यासमोर बसून एका फट  यात आपल्या उजव्या हाताचा अंगठा कापून टाकला. र  ताची धार हातातून जमिनीवर ठिबकू लागली. स्वप्नातलं ते दृश्य पाहून मेघदूत झोपेतून खडबडून जागा झाला.

त्याला आठवलं नुकतीच त्यानं एकलव्याची गोष्ट वाचली होती. त्या गोष्टीमधले गुरू द्रोणाचार्य, पांडव, कौरव सर्वजण त्याच्यापुढे उभे ठाकले. आणि मग भर दुपारी त्याच्या अंगात हुडहुडी भरली. त्याला वाटलं, 'हे सर म्हणजे गुरू द्रोणांचा अवतार तर नाहीत? पण असे कसे असेल? अवतार बिवतार असलं सगळं झूट असतं.'

तरीपण त्याला खूपच अस्वस्थ वाटायला लागलं. रात्री विचार करून करून त्याला लवकर झोप येईना. पहाटे कधीतरी त्याचा डोळा लागला. सकाळी उठायला त्याला उशीर झाला होता. तो पळत पळत वर्गाकडे आला. सर्वजण जमले होते. बरोबर आठ वाजता सरांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. ते म्हणाले,

''संगणक परीक्षेत सर्वच छात्र उत्तीर्ण झाले आहेत. काही मुलांना 'क' श्रेणी, काहींना 'ब' श्रेणी तर काही जणांना 'अ' श्रेणी मिळाली आहे. तुम्ही सर्वजण उत्तीर्ण झालात याचाच आनंद माझ्यासाठी खूप मोठा आहे.''

मग सरांनी एकेकाला मंचावर बोलावले. काहींना मोगऱ्याची रोपं तर काहींना गुलाबाची कलमं त्यांनी भेट म्हणून दिली.

''सर्वांनी या कलमांची वर्षभर नीट काळजी, निगा राखावी व त्यानंतर या कलमांची फुले मला भेट म्हणून आणून द्यावीत. हीच माझी तुमच्याकडून गुरुदक्षिणा असेल,'' असं त्यांनी सांगितलं.

त्यानंतर मेघदूतकडे पाहात सर म्हणाले,

''मेघदूत मी तुला हा खास पेनसेट बक्षीस म्हणून देत आहे. तुझी शिकण्याची जिद्द, तळमळ बघून मी भारावून गेलोय. यातल्या पेनांनी तू शाळेतल्या परीक्षेचे पेपर तर लिहीशीलच आणि रोज झोपताना नियमितपणे दैनंदिनीपण लिही...

तू खूप हुशार मुलगा आहेस. म्हणूनच या लेखणीचा वापर मु  तपणे पण तरीही समंजसपणे तू करशील, ही मला खात्री आहे. तुझ्याकडून अशाप्रकारचे लेखन होणे, हीच माझी गुरुदक्षिणा. आणि हो, तू दोन महिने मन लावून काम केल्याबद्दल हे तुझे वेतन.'' सर डोळे मिचकावत म्हणाले.

बक्षीस घेताना मेघदूतचे डोळे भरून आले. सर पुढे म्हणाले,

''मी या दोन महिन्यात तुमचा गुरू बनण्याचा प्रयत्न केला. तुम्ही मुलं यापुढेदेखील सखोल ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न कराल, अशी आशा बाळगतो आणि मी माझं मनोगत संपवितो.''

सर्व मुलांनी सरांभोवती गराडा घातला आणि त्या प्रेमळ गराड्यात सर अगदी बुडून गेले... अगदी दिसेनासे झाले.

**– सुनेत्रा नकाते**
'ओमसाई' फ्लॅट नं १६
प्लॉट नं. आर.एच. – १८५,
शाहूनगर, चिंचवड, पुणे 411019



**एक शलाका तेजाची ती, अवचित चमकून केली। उधाण आले आनंदाला, तृप्त धरित्री झाली ।।**

**अधिक जाणून घ्या:एम. एस. सुब्बालक्ष्मी** (१९१६–२००४)–हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात योगदान,भारतरत्न,रामन मॅगसेसे पुरस्कार

**प्रायोजक - श्री. सुरेंद्र कापसे, प्रिन्स्टन, अमेरिका.**

# भाषेच्या गमती-जमती

**१) शोधा या विशेषणांच्या जोड्यांना**

पुढील चौकटीमध्ये काही विशेषणे व त्यांच्या विरुद्ध अर्थाचे शब्द यांच्या दहा जोड्या उभ्या/आडव्या/तिर या ओळीत लपलेल्या आहेत. त्या जोड्या शोधून लिहा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क | आ | उं | च | ह | स | रा | स |
| य | ट | ळ | र | वि | भि | र | उ |
| रा | दा | तु | शी | ण | सु | भा | नि |
| ग | भि | त्रा | य | घ | का | ढ | र |
| झ | कृ | श | दु | ष्का | ळ | क्षु | भ्र |
| का | म | सू | का | अ | गा | हौ | य |
| को | जा | ळ | खं | ट | ढ | धी | श |
| ख | फि | ड | ल | ह | बु | फ | ट |

**२)** पुढील त त्यामध्ये काही प्रत्यय दिले आहेत. त्याचबरोबर तो प्रत्यय लावून तयार होणाऱ्या विशेषणांचे एक-एक उदाहरणही दिले आहे. त्या प्रत्येक प्रत्ययाचा वापर करून जास्तीत जास्त विशेषणे तयार करण्याचा प्रयत्न करा.

| **प्रत्यय** | **मूळ शब्द** | **विशेषण** |
|---|---|---|
| कारक | हानी | **हानिकारक** |
| वंत | विचार | **विचारवंत** |
| शीर | व त | **व तशीर** |
| दार | जबाब | **जबाबदार** |
| पूर्वक | जाणीव | **जाणीवपूर्वक** |
| सर | अग्र | **अग्रेसर** |

वरीलप्रमाणे **पद, दायक, ग्रस्त, गार, वान** हे प्रत्यय लावून विशेषणे तयार करा पाहू.

**३) परकीय शब्द – मराठी अवतार**

कोणतीही भाषा दुसऱ्या भाषेतून शब्द घेते आणि ती अधिक समृद्ध होते. मराठी भाषेमध्येही परकीय भाषांमधील काही शब्द, त्याचे मूळ रूप बदलून रूढ झाले आहेत. खाली इतर भाषांमधील मूळ रूपातील काही शब्द आणि त्यांचे 'मराठी अवतार' दिले आहेत. बघा त्यांच्या जोड्या तुम्हाला लावता येतात का?

दिलेले मूळ शब्द कोणत्या भाषेतील आहेत त्याविषयीही तुम्ही अधिक माहिती मिळवा.

| **मूळ शब्द** | **मराठी शब्द** |
|---|---|
| १.पादत्राण | i) फजिती |
| २.महिष | ii) काडतूस |
| ३.फजिहत | iii) प्यादे |
| ४. गोडाऊन | iv) किन्नर |
| ५. मत जाव | v) जिलबी |
| ६. पियादा | vi) कुरण |
| ७. कु- अरण्य | vii) म्हैस |
| ८. ि लिनर | viii) पायताण |
| ९. कुम्भकार | ix) झगा |
| १०. कारट्रिज | x) गोदाम |
| ११. जुब्बा | xi) मज्जाव |
| १२. झलाबिया | xii) कुंभार |

उत्तरे अन्यत्र

४) एकाच अर्थाच्या वेगवेगळ्या शब्दांचा वापर आपण परिस्थितीनुसार करत असतो. त्यामुळे भाषा श्रीमंत होत असते.

*उदा.* ***संध्याकाळ*** *याअर्थी तिन्हीसांज, दिवेलागण, तिसरा प्रहर, संध्या, संध्यासमय, सांज, संधिकाळ, कातरवेळ इ. शब्द आपण वापरतो.*

त्याचप्रमाणे **सकाळ, रात्र आणि दुपार** यासाठी आपण कोणकोणते शब्द वापरतो, ते शोधून 'छात्र प्रबोधन'कडे लिहून पाठवा.



ओवी जन्मदात्री आई, माझ्या अक्षरांची। नाही तीर्थ, नाही क्षीर, धार अमृताची।।

अधिक जाणून घ्या: कमल रणदिवे (१९१७-२००१) – कर्करोगाविषयी संशोधन. पद्मभूषण पुरस्कार



प्रायोजक - श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे.




**DNS BANK**

डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
(शेड्यूल्ड बँक)

अर्थाला विश्वास मिळे अन् विश्वासाला अर्थ मिळे!

**टोल फ्री: १८०० २३३ १७००**

मधुकुंज, प्लॉट क्र. पी-५२, एम.आय.डी.सी. फेज- २, कल्याण शीळ रोड,
सोनारपाडा, डोंबिवली (पू)– ४२१२०४ ☎०२५१- २८७५००० ते २८७५००९
ई-मेल: enquiry@dnsb.co.in वेबसाईट: www.dnsbank.in

रंग गंध सारं उधळून, प्रेम करावं फुलासारखं। शिशिरात झडून ग्रीष्मात वाळून, छत्र द्यावं झाडासारखं।।

**अधिक जाणून घ्या:** बानू कोयाजी (१९१७–२००४) – प्रसिद्ध वैद्यकीय अधिकारी, पद्मभूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार

**सहभागी व्हा ! मुलींसाठी - क्रीडा दले, विज्ञान दल** - युवती विभाग, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - मेधाविनी ☎ ९४२३१६२१३४

लेखांक -८




## सिनेटि स्

– डॉ. नलिनी गुजराथी

राईट बंधूंनी विमानाचा शोध लावला तो आकाशात उडणारे पक्षी पाहून ! ते ज्याप्रमाणे उडताना समतोल साधतात, त्याचप्रमाणे विमान वळवणं, स्थिर राखणं या प्रक्रिया साधण्याचा राइट बंधूंनी प्रयत्न केला. ग्रहम बेलनं टेलिफोनचा रिसीव्हर ज्यावेळी बनविला त्यावेळी त्याच्या डोळ्यापुढे अंतर्कर्णाच्या रचनेचं कार्य होतं ! 'साप आपली शेपटी गिळून वेटोळं करून बसला आहे,' हे दृश्य स्वप्नात पाहून के युलला गोलाकार अशा बेन्झीन रिंगची रचना सापडली !

वरील तीनही उदाहरणांमध्ये वरवर पाहता भिन्न घटकांमधील 'साम्या'चा विचार केला आहे, असं तुमच्या लक्षात येईल. पक्षी आणि विमान, कान आणि फोन, साप आणि बेन्झीन रिंग ह्या परस्परांपेक्षा किती भिन्न वस्तू आहेत! **सिनेटि स्** हे तंत्र अशा परस्पर भिन्न घटकांत संबंध जोडतं ! सिनेटि स् हा शब्द ग्रीक शब्दापासून तयार झाला आहे. **त्याचा अर्थ दोन भिन्न आणि वरवर पाहता परस्पर संबंध नसलेल्या, असंयुक्तिक अशा घटकांना एकत्र जोडणे असा आहे !** (Synectics means the joining together of different and apparently irrelevant elements) अशा जोडणीसाठी या तंत्रात उपमा आणि रूपके (analogies and metaphors) यांचा वापर केला जातो. रूपक किंवा उपमा देताना दोन घटकातील साम्याचा प्रामुख्याने विचार केला जातो.

शाळेत असताना 'तिचं मुख चंद्रासारखं सुंदर आहे' (उपमा) किंवा 'पाहू कोणता चंद्रमा ? धरेवरील की नभीचा?' (रूपक) अशा अलंकारांचा भाषाविषयात आपण अभ्यास करीत असतो. सिनेटि स्च्या तंत्राचा शोध लावणाऱ्या डब्ल्यू. जे. जे. गॉर्डन् यांचं असं निरीक्षण होतं, की वैज्ञानिकांनी याच साम्याचा उपयोग शास्त्रीय शोध लावतानाही अनेकदा केला आहे.

सिनेटि स या तंत्रात ४ प्रकारच्या Analogies (साम्ये) वापरल्या जातात ! **(1) Direct Analogy, (2) Personal Analogy, (3) Fantasy Analogy (4) Symbolic Analogy.**

येथे आपण पहिल्या तीन प्रकारांचा विचार करूया. **Symbolic Analogy** या चौथ्या प्रकाराचा विचार या लेखात आपण करणार नाही.

**डायरे ट ॲनॉलॉजी (Direct Analogy)** या प्रकारामध्ये दोन घटकांची प्रत्यक्ष तुलना करून साम्य शोधलं जातं. त्यानुसार दुसऱ्या नवीन वस्तूची निर्मिती केली जाते.

तुम्हाला हे माहिती आहे का, की ड्रिलिंग् मशीन - भोक पाडण्याचं मशीन कसं तयार झालं ? सुतार पक्षी ज्याप्रमाणे खोडाला भोक पाडतो ते पाहून ! मेंदू आणि संगणक यांच्या कार्यात खूपच साम्य आहे ! संगणकसुद्धा माणसाबरोबर बुद्धिबळ खेळू शकतो हे तुम्ही जाणताच! आतातर मेंदूमध्ये, शरीराच्या इतर अवयवात इले ट्रॉनिक चिप्स् बसवून दोन्हीचा एकत्रित उपयोग गेला जातो. सूर्यप्रकाशाच्या साहाय्यानं पाने अन्न तयार करतात. त्यावेळी सौरश तीचं रूपांतर रासायनिक श तीत होतं. तर 'फोटो इलेट्रिक सेल' मध्ये सौर ऊर्जेचं रूपांतर विद्युत श तीत होतं. बदक पोहताना ज्याप्रमाणे पायांची हालचाल करतं तशीच हालचाल नाव वल्हविताना वल्ह्याची होत असते. निसर्गातील कोणत्या गोष्टींचा डायरे ट ॲनॉलॉजी प्रकाराशी संदर्भ जोडता येईल. ते तुम्ही विचार करून सांगा. पुढं मी काही उदाहरणं देते.

१) पुलाचे गर्डल्स् २) पाणबुडी ३) हेलिकॉप्टर
४) पेटी - हार्मोनियम ५) अडकित्ता ६) चिमटा
७) पंप ८) कॅमेरा ९) टी. व्ही. ॲन्टेना
१०) धरण आणि कालवा

सिनेटि स्मधील जी दुसरी ॲनॉलॉजी आहे; ती आहे **पर्सनल ॲनॉलॉजी (Personal Analogy).** तुम्ही शाळेत मराठी विषयाचा अभ्यास करताना निबंध लिहिता

शिशिरातील पानगळ, अन् भरारणारा पिसाट वारा। संध्याकाळी आकाशात, राज्य करतो शुक्रतारा।।

**अधिक जाणून घ्या: असीमा चटर्जी** (१९१७-२००६)-रसायनशास्त्रज्ञ, शांतीस्वरूप भटनागर पुरस्कार मिळवणारी पहिली महिला.

प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली.

त्यात, ‘मी रायगड बोलतोय’, ‘मी शाई बोलतेय’ अशा तऱ्हेचे आत्मवृत्तपर निबंध तुम्ही लिहिता. त्यामुळे त्या वस्तूच्या/घटकाच्या भूमिकेत शिरून तुम्ही सुख दु खांचा, चांगल्या वाईटाचा तिच्या दृष्टिकोनातून विचार करता.

विज्ञानातील नवनिर्मितीचा विचार करताना अशा तऱ्हेने त्या वस्तूच्या जागी स्वत ला कल्पून विचार केला, तर आपण भावनात्मक दृष्ट्या त्या वस्तूशी तादात्म्य पावू शकतो. त्यामुळे तिच्या अडचणी, समस्या अधिक चांगल्या तऱ्हेने आपण समजून घेऊ शकतो. या दृष्टीने खालील विषयांचा विचार करून पाहा. ‘मी मोबाईल बोलतोय’, ‘मी बॅ टेरिया बोलतोय’, ‘मी टी. व्ही. बोलतोय’, ‘मी वाघ (कुठलाही एक प्राणी निवडा) बोलतोय’, ‘मी कचरा बोलतोय’, ‘मी पेट्रोलचा थेंब बोलतोय’ इ. इ.

सिनेटि स्मधील **तिसरा प्रकार** आहे **फॅन्टसी ॲनॉलॉजी (Fantasy Analogy) . अश य वाटणाऱ्या, कल्पनारम्य विश्वात सफर करणं म्हणजे फॅन्टसी ॲनॉलॉजी**. डॉ. जयंत नारळीकर, डॉ. बाळ फोंडके इ. अनेक शास्त्रज्ञांनी विज्ञान – नवलकथा लिहिल्या आहेत. त्यातून अनंत नवनवीन कल्पनांचं स्फुरण झालेलं दिसतं. त्यामुळे पुढच्या काळात काय गोष्टी घडू शकणार आहेत याचा अंदाज बांधता येतो. ‘झाडं बोलू लागली तर...’, ‘पृथ्वीवरील कार्बन डाय ऑ साईड संपला तर...’ ‘वनस्पती आणि प्राणी यांचा संकर झाला तर...’ असे विषय घेऊन विचार करून पाहा ! तसंच एखादी सायन्स – फि शन – विज्ञान – नवलकथा लिहून पाहा ! तुमच्याही वैज्ञानिक प्रतिभेला धुमारे फुटू देत !

**– डॉ. नलिनी गुजराथी**
१२७७ शुक्रवार पेठ, सुभाषनगर, रस्ता क्र. ५, पुणे – २

***होताय नं सहभागी...?*** **(इयत्ता ८ वी ते १२ वीच्या मुला–मुलींसाठी)**

**१. छात्र प्रबोधन - जोडीकार्य उपक्रमात सहभागी व्हा !** तुमच्याच गावात विविध प्रकारचे अनुभव तुमच्या गतीनुसार, वेळेनुसार घेण्याची विशेष संधी ! साहस, संवाद व बुद्धिच्या विविध पैलूंना खाद्य देणारे ७ अनुभव मिळवा.

**२. ‘कार्यानुभव’ घ्या... समृद्ध व्हा...‘छात्र प्रबोधन’च्या कार्यालयात या आणि कामातील ‘मजा’ अनुभवा! दि. ५ ते १५ मे २०१४ च्या दरम्यान ११ ते ४** या वेळात नवीन शिकण्याचा अनुभव घेण्यासाठी जरूर या.

**वरील उपक्रमांसाठी आपली नावं ‘छात्र प्रबोधन’ कार्यालयात २५ एप्रिल २०१४ पर्यंत नोंदवावीत.**



छात्र प्रबोधन संदर्भ डी.व्हि.डी. आजच राखून ठेवा...

**‘छात्र प्रबोधन’**च्या अंकांतील साहित्याचा विद्यार्थ्यांना हवा तेव्हा आणि दीर्घकाळ, सहजरीतीने, मु तपणे उपयोग करता यावा यासाठी अत्यंत नाममात्र दरात

**मूल्य : ₹ १५०**



**१२ वर्षांची संदर्भ डी. व्हि. डी.**

**(शके १९२२ ते १९३४/२००० ते २०१२)**

**१४४ अंक, ७५०० पृष्ठे**

**२८ मुख्य विषय, २३६ उपविषय, २९७० लेख**

**एकाच डी. व्ही. डी. मध्ये**

हव्या त्या वर्ष–महिन्याप्रमाणे, विषय–उपविषयाप्रमाणे तसेच हव्या त्या लेखांकाप्रमाणे लेखांची सूची व लेख पाहता येतील.

प्रत्येक महिन्याचा संपूर्ण अंक एकत्रितपणे तसेच कुठलाही लेख स्वतंत्रपणेही पाहता येईल.

सर्व लेख **PDF** स्वरूपात आहेत.

हलके हलके हसते गळते, तरूचे पाननपान। पानझडीत या ऐका आता, शिशिर ऋतुचे गान ।।

अधिक जाणून घ्या: अमृता प्रीतम (१९१९ – २००५) – प्रसिद्ध पंजाबी लेखिका, ज्ञानपीठ साहित्य अकादमी पुरस्कार

प्रायोजक - सौ. प्राची अमर परांजपे, सांगली.



# निसर्गरम्य रंगपंचमी

**– गणेश दिघे**

निसर्गाएवढा सिद्धहस्त कलाकार दुसरा कुणी नाही. त्याचा कुंचला कधीच दिसत नाही; पण क्षणाक्षणात उमटणारे त्याचे रंगीबेरंगी फटकारे मात्र मन मोहवून टाकणाऱ्या उत्तम कलाकृतीचे दर्शन देऊन जातात. कधी तो निळसर रंगाच्या पा ʻभूमीवर लाल–तांबड्या–नारिंगी–पिवळ्या–सफेद अशा रंगसंगतीत काहीतरी वेडेवाकडे चित्र रेखाटून आभाळात गमतीजमती करीत असतो. एवढ्या मोठ्या कॅनव्हासवर कधी लाखो किलोमीटरचे रेखाटन काढतो, तर कधी मोकळ्या फट्ट आभाळात एखाद्याच मोहरीच्या फुलाएवढ्या ढगाचा चिमुकला राक्षस चितारून ठेवतो. तो सकाळी जे चित्र काढतो त्याच्या विरुद्ध पठडीतले चित्र संध्याकाळी काढतो. दुपारी आणखी वेगळे, रात्री तर त्याहूनही वेगळे असते. थंडीत वेगळे, पावसात वेगळे, उन्हाळ्यात वेगळे...

पावसाळ्यात, इंद्रधनू काय दाखवेल! हिवाळ्यात रानफुलांना सप्तरंगी बहर काय आणेल! आणि उन्हाळ्यात वेडी म्हणून घोषित केलेली भाया, पळस, पांगारा ही अ कडबाज झाडे काय फुलवत बसेल. त्याच्या लहरीपणाला सीमा नाही.

रशियामध्ये ‘वाम्स’ प्रांतात एकदा तर त्याने अपरात्री म्हणजे रात्री एकदीड वाजता रंगीबेरंगी इंद्रधनुष्य दाखवून वाम्सकर मंडळींना येडेबावरे करून टाकले. लोकांनी हे बघावे म्हणून नव्हे तर आपल्या मन:शांतीसाठी ! निर्मनुष्य विषुववृत्तावर तर कधी कधी सूर्य बुडाला तरी सहा सहा तास आपल्या कॅनव्हासवरचे रंग पुसायला हा तयार नसतो. थंडीमध्ये धु यात सगळी वसुंधरा पहाटे गुरफटून टाकतो, मग ज्याप्रमाणे हिंदी सिनेमातील नायक आपल्या नववधूचा घूंघट अर्धवट उचलून तिचा चेहरा न्याहळतो तसाच वसुंधरेचा हिरवा प्रसन्न



परखडपणा आणि स्पष्टपणा, तसा ताठ कणा शोभतसे ।।

**अधिक जाणून घ्या:** प्रेम माथूर (१९२४)– व्यावसायिक पायलट परवाना प्राप्त पहिली महिला १९४८पासून उड्डाणांमध्ये सहभाग



**दहावी-बारावी, कलचाचणी पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन** – प्र. मा. संशोधिका , ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४

मुखचंद्रमा तो न्याहाळत बसतो. पानाफुलांवर दवाचे मोती पसरवून त्यांची अष्टप्रभा फाकवीत बसतो. रात्री चंद्राचा मुखचंद्रमा झाकून टाकतो. अशा वेळी चंद्रप्रभेतून दिसणारे खळे हे चित्र सुखावणारे असते.

'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स' नावाची एक जागा हिमालयात आहे. तिथे तर जगात जेवढे रंग आहेत तेवढ्या रंगांची आणि प्रकारची फुले पाहायला मिळतात. पाण्याशिवाय कमळ प्रकार तुम्हाला कसा वाटतो? 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स' मध्ये जमिनीवर उगवणारी कमळे आहेत; ती सुद्धा तीन-तीन रंग एकाच फुलात असलेली. 'हार्पर गेव्हिन' नावाचा एक जर्मन प्रवासी तर तब्बल दहा वर्षे तिथे तळ ठोकून होता. तुम्ही आम्ही लिहितो तशा त्यानं फुलांच्या दैनंदिन्या लिहिल्या. 'चांद आणि कंपनी' ह्या दिल्लीच्या प्रकाशनाने त्याच्या त्या दैनंदिन्या (पॅलेट ऑफ हेवन, मराठी अनुवाद : स्वर्गीय फुलांची मायानगरी) प्रकाशित केल्या. त्याच्या पुस्तकात तो म्हणतो, 'शेवटी तर मी प्रिन्स ए. बी. वन. ते प्रिन्स ए.बी. एट थाऊजंड' अशी सगळ्या फुलांना नावे दिली. तरीही किमान दहा हजार फुलं आणि रंगछटा मी ओळखू शकलो नाही. मलमलीच्या एखाद्या अतिशय चित्ताकर्षक रजईवर आपणही एखाद्या फुलासारखे विराजमान होऊन बसावे; तसा मी दहा वर्षे ह्या फुलांमध्ये राहिलो. लाल रंगाच्या र तवर्णी छटेपासून ते लाल रंगाच्या सफेद छटेपर्यंत जेवढ्या काही छटा असतील तेवढ्या मी इथे पाहिल्या !'

निसर्गाची किमया अगाध आहे. आपण 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स'पर्यंत जाऊ शकू, न शकू; पण आपल्या शहरात तरी च कर मारून पाहा. सदा प्रसन्न बोगनवेलीच्या पिवळ्या किरमिजी, तांबड्या, जर्द गुलाबी, लाल आणि च क हिरव्या देखील फुलांचे घोस आपल्याला भेटतील.

उन्हाळ्यात सगळीकडे रुक्ष रुक्ष झालेले असते. अशा वेळी तुमच्या-आमच्या अंगणातील बहरलेल्या गुलमोहराचे वर्णन अलंकारिक भाषेत करायला हवे काय? जरा गावाकडच्या बाजूस निघा. शंकासूर, आपल्या पिवळ्या-तांबड्या फुलांच्या शेंब्या- तुरे नाचवित आपले स्वागत करत असतो. जरा चढण चढून वर या. पळस, पांगारा अगदी डहाळी डहाळीवर लालेलाल फुलांचे गुच्छ नाचवत उभा असतो. तिथंच आसपास जमिनीपर्यंत लोळणारे, पिवळ्या धमक पाकळ्यांचे हार घेऊन भाया आपले अभीष्टचिंतन करू लागतो. त्या झाडावरून नजर बाजूला हलतच नाही. झाड कुठचे हो ते ! ती तर पिवळ्या धमक पाकळ्यांची एक ओसंडून वाहणारी रासच वाटते.

जरा चढण चढून आणखी वर जा. कोकणपट्टीची लाल तांबूस अगदी कुंकवाइतकी म्हटलं तरी चालेल अशी लाल माती पायघड्या घालून तयार. इथं आता उन्हाळ्यात कोण स्वागत करणार? तर तेलकट तेलकट पानांच्या, राकट करवंदीच्या जाळ्या पांढऱ्या झालेल्या असतात. काळवंडलेली हिरवी पाने आणि त्यावर पांढऱ्या शुभ्र फुलांची वेलबुट्टी शोभावी अशी कळा नाचवत करवंदीच्या जाळ्या वाटेतच उभ्या. आपल्या आईच्या ठेवणीतल्या चंद्रकलेच्या दसपट देखणी चंद्रकला नेसून इथे करवंद तयार असते. आणखी थोडं वर जा! आघाटीची शेंदरी फुले, कावळीची धमक पिवळी तोरणे, तंटणीच्या शेंदरी, पिवळ्या, गुलाबी, अष्टरंगी फुलांचे चिमुकले गुच्छ नजरेस येतील. कारवी, दौणीची राखाडी फुले. रानशेवग्याची पांढरी फुले! दोन डोळ्यांना झेपणार नाहीत एवढे रंग आपल्या आसपास उधळलेले असतात. ते टिपायला तेवढेच रसिक डोळे मात्र हवेत आणि ह्या रंगपंचमीत न्हायला हवे निसर्गाइतकेच कलास त उत्फुल्ल मन.

रंगपंचमी जवळ येते आहे. आता आपल्या डोंगरदऱ्यात कसले रंग खेळले जातील, माहीत आहे? भेंडीच्या झाडाला आता पिवळी फुले येऊ लागली असतील. जसे बॅडमिंटनचे 'शटल' असते ना अगदी हुबेहूब तशीच पिवळी आणि लाल फुले! त्यांच्या बुंध्याला बुचासारखा जो भाग असतो तो



**कधी मात्र गोड, शब्द जे अजोड। आनंदाची जोड, देण्यां येती।।**



**अधिक जाणून घ्या : महाश्वेतादेवी** (१९२६)-पत्रकार, लेखक व सामाजिक कार्यकर्त्या, साहित्य अकादमी, ज्ञानपीठ, मॅगसेसे पुरस्कार

**प्रायोजक - श्री. अजित भिडे** (डायरे टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. ☎ २५३८०४०६) **पुणे.**

ठेचला, की त्यातून पिवळा रंग मिळतो. झालं. त्यात पाणी कालवायचं हवं तेवढं आणि खेळायचा रंग हवा तसा मस्त!! कोणत्याही विपरीत परिणामांशिवाय! पण आपण पडलो शहरवासी. आपल्या नशिबात कुठे असा रंग बनवून खेळण्यातला आनंद? आपण रंग बाजारातून आणणार आणि जमेल अशा बेताने तो खेळणार. त्यातही किती धोके! डोळ्यात गेला तर डोळे जायची भीती–पोटात गेला तर च क जीव जायची भीती. खरेतर अशा रंगांपासून आपण दोन हात लांबच राहिलेले बरे. बाजारातून रंग आणून हात दाखवून अवलक्षण करण्यापेक्षा ही रंगपंचमी जरा वेगळ्या ढंगानं खेळली तर!

आता म्हणाल, 'म्हणजे कशी?' रंगपंचमीची तुम्हाला सुट्टी असेलच. (परीक्षा संपली नसेल तर परीक्षा संपल्यावरसुद्धा रंगपंचमी खेळायला हरकत नाही!) मग चला आसपासच्या डोंगरदऱ्यात आणि पाहा उघड्या डोळ्यांनी निसर्गानं चालवलेली रंगांची उधळण. कृत्रिम रंग आपल्या इष्टमित्रांच्या अंगावर टाकून त्यांच्या अनारोग्याला कारणीभूत होण्यापेक्षा रानावनात हिंडून रंगीबेरंगी फुले जमवा (हां, थोडीच बरं का? सगळं रान ओरबाडायचं नाही). त्याचे गुच्छ बनवून आपल्या मित्रमंडळींना वाटा, त्यांच्या शर्टावर त्या फुलांचे रंग लावा. सगळा वेळ कसा आनंदात जाईल. शिवाय ह्या रानफुलांचा सुगंधही चिरस्मरणात राहील, असाच असतो बरं का!

कृत्रिम रंगांच्या *साईडइफेक्टचा 'इफेक्ट'* तुमच्या नाजूक नात्यांवर करून घेण्यापेक्षा हा *इफेक्टिव* पर्याय कसा वाटला? या निमित्ताने रानावनात सैर करण्याचा आनंद मिळेल आणि रंग खेळण्याचीही मजा अभिनव पद्धतीनं लुटता येईल. कशी आहे कल्पना? राबवा तर मग!

**– गणेश दिघे**
१३७, प्रेरणा प्रतिष्ठान, रामनगर,
चिंचवड. पुणे 411019

छात्र प्रबोधन पूर्वप्रसिद्धी
सौर चैत्र शके १९१९/मार्च १९९७

ज्ञान प्रबोधिनी
नेतृत्व संवर्धन केंद्र

**ज्ञान प्रबोधिनी नेतृत्व संवर्धन केंद्र**
**प्रशासकीय /सामाजिक /औद्योगिक क्षेत्रात**
**नेतृत्व करायची इच्छा असणाऱ्या युवक–युवतींसाठी**

**Leadership Orientation Camps/नेतृत्व संवर्धन शिबिरे**

**१२ वी व F.Y. (परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी)**
**सुट्टीत दरमहा ५ दिवसांची निवासी शिबिरे** (पुणे परिसरात, मराठी–इंग्रजी मिश्र माध्यमात)
**♦ २५ ते २९ एप्रिल ♦ २३ ते २७ मे ♦ १३ ते १७ जून**

**नेतृत्वाच्या विविध पैलूंना स्पर्श करणारी कृतिसत्रे**
- कौशल्य प्रशिक्षण
- प्रेरणादायी अनुभवकथने
- अनोखी जोडीकार्ये
- साहस सहल
- स्पर्धा परीक्षांची ओळख
- अर्थपूर्ण मोजकी व्याख्याने
- आव्हानात्मक गटकार्ये
- अनोख्या स्पर्धा, गटचर्चा

**Know Yourself ...Explore Yourself ...Challenge Yourself**

**शुल्क रु. ३,४००/–** (सेवाकर व प्रशिक्षण–निवास–प्रवास–भोजनासह)

*निव्वळ टाईमपास, आळस, सर्वसाधारण शिबिरे यांमध्ये वेळ घालवण्यापेक्षा*
*स्वत:मध्ये असलेल्या नेतृत्वाच्या क्षमता विकसित करण्यासाठी*
*कोणत्याही एका शिबिरात सहभागी व्हा!*

**प्रत्येक शिबिरासाठी मर्यादित प्रवेश ! लवकरात लवकर शुल्क भरून नावनिश्चित करा.**
संपर्क : ज्ञान प्रबोधिनी, नेतृत्व संवर्धन केंद्र, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०
दूरभाष – ०२० २४२०७१७९, नचिकेत – ९४०४२२५३७८

**ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्र व नेतृत्व संवर्धन केंद्राद्वारा**
**प्रिपरेटरी व फाऊंडेशन-बेसिक कोर्स**
एकाच वेळी स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी व नेतृत्वाची पायाभरणी
(पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी वीकएण्ड बॅचेस)
जुलै ते ऑ टोबर २०१४ च्या बॅचेससाठी प्रवेश परीक्षा एप्रिल पासून सुरू !



गुलमोहोराचे झाड बहरले, लक्ष फुलांचे रम्य थवे। हिरवी पाने लवलव करती हरवून जाती फुलांसवे।।

**अधिक जाणून घ्या: किरण बेदी** (१९४९) – सक्षम महिला पोलीस अधिकारी, राष्ट्रीय शौर्य पुरस्कार, महिला शिरोमणी

**नागरीवस्त्यांमधील किशोरींसाठी उपक्रम** - नागरीवस्ती अभ्यासगट, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - हर्षाताई ☎ ९३२५२७२३३७

# गणिती खुराक...४ जादूचे चौकोन (अंतिम लेख)

## शिकण्याची रीत !

– महेन्द्र सेठिया

छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकापासून ४ अंकांमध्ये आपण ही लेखमाला चालविली. दिवाळी अंकामध्ये तुम्हाला जादूचे चौकोन तयार करून बघायला सांगितले होते. तुमच्यापैकी किती जणांनी ते करून बघण्याचा प्रयत्न केला ? 'पुढच्या अंकात जादूचे चौकोन तयार करण्याची पद्धत देणारच आहेत मग कशाला डोके चालवा! नसता डो याला ताप!', असा विचार तुमच्यापैकी किती जणांनी केला? **नवीन काही शिकण्याची, प्रयत्न करून बघण्याची, डोके वापरून एखादी पद्धत, रीत शोधण्याची खटपट करणे यासारखा आनंद नाही. यातून खऱ्या अर्थाने शिकण्याची सुरुवात होते.** गणित जेवढे अवघड वाटते तेवढे नाहीये! आकड्यांशी मस्ती अन् दोस्ती करता करता गणितातल्या गमतीजमती कळायला लागल्या की गणिताशी गट्टी जमलीच म्हणून समजा. तसं घडावं म्हणून ही लेखमाला आपण सुरू केली. तुमच्या पाठ्यपुस्तकातल्या गणिताच्या बाहेरची !

विषम संख्यांचे जादूचे चौकोन व चार क्रमांकाच्या पटीतले जादूचे चौकोन कसे तयार करायचे याची रीत आपण आधीच्या लेखांमध्ये पाहिली. 'गणित समजावून सांगितल्याशिवाय आपल्याला कळणारच नाही, नुसते वाचून कसे काय गणित समजेल?', असा तुमच्यापैकी अनेकांचा मोठ्ठा गैरसमज असतो. तो दूर व्हावा यासाठी हे जादूचे चौकोन कसे तयार करायचे याची रीत उदाहरणासह लेखांमध्ये दिली होती. ही रीत समजून घेण्याचा प्रयत्न तुम्ही केला असेल तर गणिताचे पाठ्यपुस्तकही तुमचे-तुम्हाला शिकता येईल. रीत वाचताना काहीच कळलं नाही असं कधीच होत नाही. काही वेळेला मधली एखाद-दुसरी पायरी आपल्याला समजत नाही. त्यावेळी नेमकं काय केलं, हे चटकन लक्षात येत नाही. अशावेळी घरातील मोठ्या सदस्यांना, गणिताची आवड व गती असणाऱ्या मित्रांना, शिक्षकांना तुम्ही ते विचारता का? जे तुम्हाला समजलं नाही ते समजेपर्यंत तुम्ही अस्वस्थ असता का? **शिकण्यासाठी ही अस्वस्थता फार महत्त्वाची आहे बरं का!** ती तुम्हाला स्वस्थ बसू देत नाही. श य होईल त्याची मदत घेऊन किंवा **दिलेली रीत पुन्हा पुन्हा वाचून ती तुम्हाला जेव्हा समजेल तेव्हाच तुम्ही शांत होता.** यातून होणारं शिक्षण प कं होऊन जातं. त्यासाठी पाठांतर करावं लागत नाही. स्वत: काहीतरी नवीन शिकण्याचा आनंद तर विलक्षणच असतो. आता या भूमिकेतून तुम्ही पुन्हा हे लेख वाचा बरं, पाहा समजतायंत का? समजून घेता येतात का ते?

**पुढची पायरी असते ती एखादे तयार उत्तर दिले असेल तर त्याला ती रीत लावून बघून मग पडताळा करण्याची, तपासून पाहण्याची !** काही चूक असेल तर ती चूक शोधण्याची ! त्यासाठी तुम्हाला मागच्या अंकात ५ क्रमांकाचा जादूचा तयार चौकोन दिला होता आणि ३ क्रमांकाच्या जादूच्या चौकोनाची रीत त्यालाही लागू पडते ना, ते तपासायला सांगितलं होतं. असं करताना आपली रीत अधिक प की होते. आकलन अधिक चांगलं होतं.

**त्याच्या पुढची पायरी, लिहून दिलेली रीत वाचून, समजून घेऊन त्याआधारे स्वत:च गणित सोडविण्याची धडपड करण्याची.** प्रत्येक लेखाच्या शेवटी तुम्हाला एक-एक पुढच्या क्रमाचा जादूचा चौकोन तयार करायला सांगितला होता. किती जणांनी तो केला? तसा तयार करता आला, तर आपला आनंद अजून वाढतो. जे मी शिकलो, जे मला समजलं ते मला वापरून बघता आलं याचा तो आनंद असतो.

**मग आपल्याला प्रश्न पडायला हवा तो 'हीच रीत का? ही कोणी शोधून काढली?** ती त्याला कशी सापडली? त्यामागचा तर्क विचार काय? अजून काही पद्धती असतील का? त्या या पद्धतींपेक्षा सोप्या असतील की अवघड? ४ च्या पटीत नसलेले पण सम क्रमाचे जादूचे चौकोन (६,



रंग दिवसाचे बदलत जातात, शेवटी संध्यारंग दिसतो। निसर्गाच्या या रंगपंचमीत, चित्र सौख्याचे फुलवितो।।

अधिक जाणून घ्या: बचेंद्री पाल (१९५४)- एव्हरेस्टवर पाय ठेवणारी पहिली भारतीय महिला, अनेक शिखरं पादाक्रांत

कालोचित, अर्थपूर्ण संस्कारांसाठी - पौरोहित्य विभाग, संत्रिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४७

१० इ.) कसे तयार करता येतील? मला एखादी वेगळी पद्धत शोधून काढता येईल का? आकड्यांशी खेळून अचानकपणे एखादा जादूचा चौकोन जमून गेला, तर तो पुन्हा करता येण्यासाठी कोणत्या पायऱ्या आपण वापरल्या हे पुन्हा आठवून / करून पाहून लिहून काढता येईल का? या रीतीवर आधारित काही वेगळ्या प्रकारची कोडी, गणिते तयार करता येतील का?' असे **प्रश्न पडणे व त्याची उत्तरे शोधण्यासाठी धडपडणे म्हणजे शिकण्याची अजून वरची पायरी गाठणे होय!** शिकण्याच्या पायऱ्या तुम्ही चढत गेलात की, त्यातून मिळणारा आनंदही निश्चितच वरच्या पायरीचा असेल बरं का !



शिकण्याच्या या पायऱ्या तुम्ही चढाव्यात यासाठी **'गणिती खुराक–जादूचे चौकोन'** ही लेखमाला आपण अंकातून दिली. डॉ. वर्षा जोशी व डॉ. अरुण जोशी यांनी अत्यंत सोप्या पद्धतीने ती तुमच्यापर्यंत पोहोचवली. हे लेख तुम्ही या हेतूने वाचले नसतील तर पुन्हा एकदा वाचा. आणि नुसते हे लेखच नाही तर तुमचे कोणतेही पाठ्यपुस्तक स्वत:चे स्वत: शिकण्याची यु ती तुम्हाला यात सापडेल. अगदी गणिताचे पाठ्यपुस्तक सुद्धा! आणि परीक्षेपुरता अभ्यास करण्याऐवजी परीक्षेपलीकडचा अभ्यास करण्यात आनंद काय असतो हे ही तुम्हाला समजेल!

या लेखमालेतील अजून २ लेख, लेखकांनी छात्र प्रबोधनकडे पाठवले आहेत. त्यांची रीत अजून अवघड आहे. तुमच्यापैकी ज्यांना असं अवघड समजून घेण्याची, बुद्धीला आव्हान देण्याची इच्छा असेल, त्यांनी छात्र प्रबोधनशी संपर्क साधावा. त्यांना ते लेख ई–मेल द्वारा वा पोस्टाद्वारा पाठवायला आम्हाला न कीच आनंद होईल. तुमच्या प्रतिसादाच्या प्रतीक्षेत आम्ही आहोत!

**– महेन्द्र सेठिया**
संपादक, छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ, पुणे – ३०

**लेखमालेचे लेखक – डॉ. वर्षा जोशी,डॉ. अरुण जोशी ई–मेल:** varshajoshi611@gmail.com, **मोबा.** 9822024233

**✻ या लेखमालेवरील प्रतिसादाबद्दल विशेष कौतुक ✻**

प्रति,
श्री. डॉ. अरुण जोशी सर व डॉ. सौ. वर्षा जोशी मॅडम
शिरसाष्टांग नमस्कार,

मी विराज, चंद्रकांत पाटकर विद्यालय, डोंबिवली इ. आठवीत (इंग्रजी माध्यम) शिकत आहे. व मी छात्र प्रबोधनचा नियमित वाचक आहे. आपल्या जादूच्या चौकोनावरील लेखांमुळे मला एकंदरच गणित विषयामध्ये, कोडी सोडवण्यामध्ये गोडी निर्माण झाली. खूप खूप मज्जा येते अशी कोडी सोडवताना. पुढच्या लेखात काय असेल याची उत्सुकता लागून राहाते.

अंकात केलेल्या आवाहनाप्रमाणे मी ७ क्रमांकाचा जादूचा चौकोन तयार करून पाठवला आहे.

**विराज साने** (इ. आठवी)
१/१७ 'बी', 'शिवम् कॉम्प्ले स, राजाजी पथ, डोंबिवली(पू.)

**७ क्रमांकाचा जादूचा चौकोन**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३० | ३९ | ४८ | १ | १० | १९ | २८ |
| ३८ | ४७ | ७ | ९ | १८ | २७ | २९ |
| ४६ | ६ | ८ | १७ | २६ | ३५ | ३७ |
| ५ | १४ | १६ | २५ | ३४ | ३६ | ४५ |
| १३ | १५ | २४ | ३३ | ४२ | ४४ | ४ |
| २१ | २३ | ३२ | ४१ | ४३ | ३ | १२ |
| २२ | ३१ | ४० | ४९ | २ | ११ | २० |

**पान क्र. २३ वरील कोड्यांची कोड्याची उत्तरे –**

**१)** आळशी × कामसू, सुरस × निरस, विरळ × दाट, रडका × हसरा, अखंड × तुटक, उंच × बुटका, ढगाळ × निरभ्र, कृश × जाड, भित्रा × धीट, सुकाळ × दुष्काळ

**३)** १ –viii, २ – vii, ३ – i, ४ – x , ५ – xi, ६ – iii, ७ – vi, ८ – iv, ९ – xii, १० –ii, ११ – ix, १२ – v

आम्रमोहोराचा गंध वाऱ्यावर पसरला। आसमंत सारा सुगंधाने धुंद झाला।।

**अधिक जाणून घ्या: नीरजा भनोट** (१९६३–८६) – विमान परिचारिका, मरणोत्तर अशोकचक्र मिळवणारी पहिली महिला

**एप्रिल-मे-जूनमध्ये - बारावीसाठी निवासी नेतृत्व शिबिरे** - नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४२०७१७४

# संवाद कौशल्य
लेखांक -९

## गटचर्चा

– महेन्द्र सेठिया

दिवाळी अंकापासून 'संवाद कौशल्य' ही लेखमाला सुरू झाली आहे. व्य तींच्या प्रत्यक्ष सहवासात असताना तोंडी स्वरूपात केलेल्या संवादाचे वेगवेगळे प्रकार आपण यापूर्वी पाहिले. त्यामध्ये जसे औपचारिक आणि अनौपचारिक असे प्रकार आहेत तसेच एकाचे-एकाशी (संभाषण, मुलाखत इ.) एकाचे-अनेकांशी (व तृत्व) आणि अनेकांचे-अनेकांशी केलेले संवाद असेही प्रकार आपण पाहिले. त्यापैकी अनेकांनी- अनेकांशी केलेल्या संवादामध्ये गप्पा, गटचर्चा, गटबैठकी, गटातला वादविवाद असे काही उपप्रकार येतात.

४-५ मित्र-मैत्रिणी जमल्या की, आपल्या गप्पा अगदी सहजपणे सुरू होतात. त्या गप्पांना एकच विषय असतो असे नाही. व ता वा श्रोता; अशा कोणत्यातरी एका भूमिकेतून गटातील सर्वजण मनापासून सहभागी होतात, तोपर्यंत गप्पा रंगतात. थोड यात गप्पांमध्ये विचार व भावनांची अनौपचारिक देवाणघेवाण असते.

**या गप्पा मारणाऱ्यांची संख्या जशी वाढत जाते आणि त्यातून साध्य करण्याचे हेतू जसजसे नेमके होत जातात, तसतसे या गप्पांचे रूपांतर गटचर्चेत, गटबैठकीत होते.** एखाद्या विषयावरील साधक-बाधक चर्चेतून त्याविषयाचे विविध पैलू समजतात; एकमेकांची मते समजतात. परिस्थितीचे सर्व बाजूने आकलन होते. गटचर्चेत सर्वांचा सहभाग असतो, त्यामुळे एखाद्या समस्येचे उत्तर शोधणे सहज श य होते. एखादा निर्णय सर्वांच्या सहमतीने घेता येतो. एखाद्या उपक्रमाचे स्वरूप ठरवण्यासाठी गटचर्चांचा पुष्कळ उपयोग होतो.



खाली काही विषय सुचवत आहे. तुम्ही ७-८ जणांचा गट जमवून त्यातील एका किंवा अधिक विषयांवर २०-२५ मिनिटांची गटचर्चा करून पाहा बरं.

१. शाळेमध्ये खेळ व व्यायामासाठी रोज एक तास राखून ठेवलेला असावा की नसावा?

२. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची परिस्थिती

३. शाळेतील/ सोसायटीतील/ गावातील कचऱ्याच्या समस्येवर काय उपाय करता येतील?

४. सुट्टीत शाळेमध्ये जादा तास ठेवायचे की नाही, याबाबतचा निर्णय वर्गाने मिळून कसा घ्याल?

५. शाळेत/सोसायटीत/गल्लीत गणेशोत्सव कसा साजरा करायचा?

विषय माहीत नसताना अचानकपणे गट जमवून, आता 'आज आपण या विषयावर चर्चा करणार आहोत,' असं म्हणून लगेच चर्चा सुरू होऊ शकेल का? कदाचित काही जण उत्स्फूर्तपणे आपापली मते मांडायला सुरुवात करतीलही; पण त्याला माहितीचा आधार असेलच असे नाही; विचारही नेमके नसतील आणि त्यामुळे ती खूपच उथळ, वरवरची चर्चा होईल. म्हणून गटचर्चा करण्यापूर्वी काही तास/दिवस आधी गटचर्चेत सहभागी होणाऱ्या सर्वांना गटचर्चेचा विषय व हेतू माहीत असायला हवा, तरच चर्चा अधिक अर्थपूर्ण होऊ शकेल.

गटचर्चेचा विषय पुरेसा आधी कळलेला असला तरी त्यावर गटातील प्रत्येकाने काही गृहपाठ करून येणे अत्यावश्यक आहे. त्याबाबतचे वाचन, त्यावरची आपली मते याची पुरेशी तयारी (मनात व श य झाल्यास कागदावरही) करून यायला हवी. गटचर्चेची जागा, बसण्याची व्यवस्था (सतरंजी, खुर्च्या, सोफा इ.), चर्चेची वेळ निश्चित असावी (व प्रत्येकाने ती पाळावी), जागा हवेशीर, शांत, पुरेसा प्रकाश असलेली, सर्वांना गोलामध्ये



सडा अंगणी उल्हासाचा, घालू हसतमुखाने। दारी तोरण लावू, गुंफुनि उत्साहाची पाने ।।

अधिक जाणून घ्या: कल्पना चावला (१९६१-२००३)- पहिली भारतीय महिला अंतराळवीर, नासा स्पेस फ्लाईट मेडल

७वी ते ९वीच्या मुलामुलींसाठी- सामूहिक विद्याव्रत संस्कार - संत्रिका व संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२

बसता येईल एवढी मोठी असावी. गटचर्चेची अशी पूर्वतयारी उत्तम झाली म्हणजे गटचर्चा अर्थपूर्ण व गांभीर्याने व्हायला मदत होते.

आता गटचर्चेसाठी सर्वजण बसले की, कोणीतरी पुढाकार घेऊन गटचर्चेचा विषय पुन्हा एकदा सर्वांना सांगावा लागतो. विषयाचे महत्त्व, त्यावर चर्चा करण्याचे हेतू थोड यात सर्वांना सांगून चर्चेस सुरुवात करावी लागते. इथपर्यंत सगळं ठीक होतं. पण मग पुढे काय होतं? गटातला एखादाच कोणीतरी सलग खूप बोलतो, रटाळपणे तेचतेच मुद्दे मांडतो, मूळ विषयाला सोडून भलतेच मुद्दे मांडतो. खूप मोठ्ठ्याने बोलून आपला मुद्दा सर्वांनी मान्य करावा असा हट्ट धरतो. कधीकधी कोणीच काही बोलत नाही. सगळे नुसतेच एकमेकांकडे किंवा खाली बघत बसतात. कधीकधी एखाद्याने एखादा मुद्दा मांडला की, त्याची खिल्ली उडविली जाते, चेष्टा केली जाते. मग तो चिडतो आणि मूळ मुद्दा बाजूला राहून वेगळ्याच मुद्द्यावर भांडणं सुरू होतात. काहीजण आपापसात बोलायला लागतात. मोठ्या गटात ३-४ उपगट तयार होतात आणि त्यांच्यात्यांच्यात चर्चा सुरू होते. किंवा एकाचवेळी खूप जण बोलतात. मग आपले म्हणणे सर्वांनी ऐकावे म्हणून प्रत्येकजण अधिक मोठ्याने बोलायचा प्रयत्न करतो. आणि एकूणच गोंधळ सुरू होतो. परस्परांच्या हेव्यादाव्यातून मुद्दा नीट समजून न घेताच चर्चा मुद्द्यावरून गुद्द्यावर येते. दुर्दैवाने आपल्या संसदेत हे दृश्य वारंवार दिसते ! असे घडू नये म्हणून **गटचर्चेचे काही नियम सर्वांनी समजून घेऊन ते पाळले पाहिजेत.**

१. गटचर्चेत सर्वांनी बोललेच पाहिजे.
२. एकूण असलेल्या वेळेला गटातील सदस्यांनी भागून जी वेळ येईल. (उदा. चर्चेसाठी अर्धा तास असेल व १० जण गटात असतील तर ३० मि. भागीले १० म्हणजे प्रत्येकाच्या वाट्याला ३ मि.येतील) त्यापेक्षा जास्त वेळ एका सदस्याने पहिल्या फेरीत बोलू नये.
३. एकावेळी एकानेच बोलावे.
४. एकजण बोलत असताना गटातील उर्वरित सदस्यांनी आपापसात बोलू नये.
५. मूळ विषय सोडून अन्य विषय चर्चेत आणू नयेत.

आता हे **नियम सर्वजण पाळताहेत ना, हे पाहण्याची जबाबदारी गटप्रमुखाची** असते. सर्वजण मनापासून चर्चेत सहभागी होतील, सर्वांना आपले मत मांडण्याची संधी असेल अन् प्रत्येकाचे म्हणणे गटातील इतर सर्व सदस्य नीटपणे ऐकून घेतील हे त्याने पाहायचे असते. त्याचबरोबर ज्या विषयावर चर्चा करायची आहे, त्याच विषयावर चर्चा होईल, त्याला अनावश्यक फाटे फुटणार नाहीत, चर्चा इतर विषयांवर घसरणार नाही, त्या विषयाचे विविध पैलू/बाजू चर्चेमध्ये येतील याचीसुद्धा काळजी गटप्रमुखाने घ्यायची असते. **आशय सांभाळणे व वातावरण निकोप ठेवून सर्वांना चर्चेत सहभागी करून घेणे**, अशी दुहेरी जबाबदारी गटप्रमुखाची असते. गट खूप मोठा असेल किंवा विषय खूप गुंतागुंतीचा असेल, तर अशावेळी गटचर्चेसाठी २ प्रमुख असावे लागतात. एकजण विषयानुसार चर्चा अर्थपूर्ण होईल याकडे प्राधान्याने लक्ष देईल, तर दुसरा सर्वांचा सहभाग व वातावरण मोकळं व पोषक राहील यासाठी प्रयत्न करेल.

गटचर्चा चांगली होण्यासाठी सर्वांचे चित्त, लक्ष गटचर्चेमध्येच असायला हवे त्यासाठी **गटातील सर्वांना उत्तम ऐकता येणे जरूरीचे आहे. चांगले ऐकणे** म्हणजे...

१. बोलणाऱ्याच्या आवाजातील विविध छटा, उपहास, स्वर समजावून घेणे.
२. बोलणाऱ्याचे हावभाव, हातवारे याकडे लक्ष देऊन त्याच्या म्हणण्याचा भावार्थ, मतितार्थ समजून घेणे. नुसत्या शब्दामधून व्य त न होणारी काही माहिती त्याच्या देहबोलीवरून समजून घेणे.
३. आपले नीट लक्ष असल्यास आपला प्रतिसाद हा सहज, स्वाभाविक असतो. योग्य ठिकाणी दाद देणे, बोलणाऱ्याच्या मुद्द्यानुसार चेहऱ्यावरच्या रेषांमधून प्रतिसाद देणे सहज जमत नसेल तर सुरुवातीला प्रयत्न करून असा प्रतिसाद देण्याची सवय लावून घ्यावी.
४. बोलणाऱ्याच्या नजरेला नजर देणे.

आपण लक्षपूर्वक ऐकतो आहोत व प्रतिसाद देत ऐकतो आहोत याचा अर्थ समोरच्याच्या म्हणण्याला आपण महत्त्व देतो, त्यात आपल्याला रस आहे, त्या व्य तीबद्दल आपल्याला जिव्हाळा आहे, असा होतो. त्यामुळे संवादात



आनंद, शांती, समाधान, गाणे गाऊन मिळवू। सुरांच्या दुनियेत जाऊन जीवन आपण फुलवू।।

अधिक जाणून घ्याः पी. टी. उषा (१९६४) – प्रसिद्ध धावपटू, सुवर्णकन्या किताब, पद्मश्री, अर्जुन पुरस्कार

**NTS मार्गदर्शन, विविध कौशल्यांचे प्रशिक्षण** - बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१९४

कोणतेही गैरसमज न होता जास्त अर्थपूर्णता येते. नीट ऐकून घेतले तरी प्रत्येकवेळा समोरच्याचे म्हणणे आपल्याला पटतेच असे नाही. (प्रत्येकवेळी ते पटायलाच हवे/पटण्यासारखेच असते असेही नाही) मग काय होतं? गटातल्या कोणीतरी प्रतिक्रिया देतो. कशा असतात या प्रतिक्रिया...

*'काय मूर्खासारखे तेच तेच परत बोलतो आहेस?', 'त्याच्या म्हणण्याला काही अर्थ नाही', 'मला यातलं काहीही पटत नाही' , 'नुसती बडबड करून काहीच साध्य होणार नाही'* इ. इ.

अशी प्रतिक्रिया दिल्यामुळे काय घडतं? ज्याला हा प्रतिसाद दिलेला असतो तो रागावतो, चिडतो, भांडतो किंवा एकदम गप्प बसतो. एकमेकांची उणीदुणी काढणे, टोमणे मारणे, उपहास करणे सुरू होते व यातून परिस्थिती अधिकच चिघळते. मग मुख्य मुद्दा बाजूला राहून एकमेकांची भांडणे सोडवण्यात, समजूत काढण्यातच बराच वेळ जातो. हे टाळायचे असेल, तर ऐकण्याबरोबरच समोरच्याला योग्य रितीने प्रतिसाद देणंही तितकंच महत्त्वाचं असतं. आता वर दिलेली चार वा ये आशय तोच ठेवून कशी मांडता येतील बरं !

*'तुझ्या बोलण्यातील अमूक अमूक हा भाग नक्कीच विचार करण्याजोगा आहे, पण माझं काहीसं वेगळं मत आहे', 'तुझा मुद्दा ठसविण्यासाठी तू तोच मुद्दा वेगवेगळ्या अंगाने मांडत आहेस. पण काही बाबतीत मला अधिक भर घालावीशी वाटते', 'आपल्या बोलण्याला कृतीची जोड कशी देणार याचाही विचार आपण सर्वांनी अधिक करावा असं वाटतं.'*

खरंतर आशय तोच; पण सौम्य पद्धतीने मांडल्याने संवाद सहज होतो. आपले विचार मांडून गटातील सदस्य दुखावले जात नाहीत उलट जोडले जातात. आपले म्हणणे वेगळे अन् विरुद्ध असले तरी ऐकून घेतले जातात. चर्चेमध्ये वैय तिक मानअपमान न ऐकवता ती सुरळीत निष्कर्ष व उद्दिष्टांच्या वेगाने सरकते. म्हणून **समुचित अभिप्रायाचे तंत्र गटचर्चेमध्ये प्रत्येकानेच अवगत केले पाहिजे.** या तंत्राप्रमाणे अभिप्रायाचे २ भाग होतात.



१. समोरच्या व्य तीच्या ज्या गोष्टी आपल्याला पटल्या असतील त्यांचा व त्याच्या चांगल्या गुणांचा आधी उल्लेख करायचा. त्याद्वारे सुरुवात करायची. न पटणाऱ्या, मतभेदाच्या किंवा आपल्याला जे वेगळे मुद्दे मांडायचे असतील त्याची मांडणी त्यानंतर करायची. म्हणजे **आपल्या बोलण्याचा क्रम सांभाळायचा.**

२. नुसते टोमणे, विशेषणे किंवा मतभेद न मांडता त्यामागची काही कारणे, त्यावर स्वत:चा असलेला विचार थोड यात सांगायचा.

गटचर्चा उत्तम होण्यासाठी गटचर्चेची पूर्वतयारी उत्तम होणं, गटचर्चेचे नियम सर्वांनी पाळणं, गटातील सर्वांना उत्तम ऐकता येणं आणि गटातील सर्वांनी समुचित अभिप्राय देण्याचं तंत्र अवगत करणं आवश्यक आहे.

गटचर्चा अधिक यशस्वी होण्यासाठी विषयाची जाण, विचारातील स्पष्टता असायला हवी. शांतपणे दुसऱ्याचे विचार ऐकून घेणे व स्वत:चे विचार दुसऱ्याला न दुखावता प्रभावीपणे, संयमाने मांडणे या गोष्टींची जोड देता आली तर गटचर्चा अधिक अर्थपूर्ण, आनंददायी व उद्दिष्ट-हेतू साध्य करणारी होईल यात शंकाच नाही. पण त्यासाठी गटचर्चेला सुरुवात तर करा! प्रत्येक गटचर्चेनंतर विश्लेषण करून, चुकांची दुरुस्ती करून पुढची गटचर्चा अधिक चांगली व्हावी यासाठी प्रयत्न करा. गटात उत्तम रितीने काम करण्यासाठी उत्तम संवाद आवश्यक आहे. त्यासाठी गटचर्चा कौशल्य वाढवायलाच हवं ! हो ना?

**- महेन्द्र सेठिया**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ, पुणे - ३०



हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० फाल्गुन, शके १९३५, १ मार्च २०१४ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे -२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

# आम्ही कॉपी करणार नाही...

**देशामध्ये आज विविध क्षेत्रांत चाललेल्या भ्रष्टाचाराच्या बातम्या वाचताना तुम्हाला चीड येत असेल; पण परीक्षेत कॉपी करणे हाही एक प्रकारचा भ्रष्टाचारच आहे. त्याचे गांभीर्य तुम्हाला समजते का? भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्याची विद्यार्थिदशेतील पहिली पायरी म्हणजे कॉपी करण्याचा भ्रष्टाचार थांबवणे ! आजच आपण ठाम निश्चय करूया,**

**'मी कोणत्याही परीक्षेत कॉपी करणार नाही व इतर कोणासही कॉपी करू देणार नाही.'**

**हा निश्चय तुम्हाला भविष्यात दुष्प्रवृत्तींविरुद्ध लढण्याचे बळ व आत्मविश्वास देईल. पुढे काही मान्यवर व्यक्तींनी या संदर्भात तुम्हाला खास संदेश दिला आहे. तुमच्या निश्चयाला यातून नक्कीच पाठबळ मिळेल.**

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. आटपाट नगर होतं. त्या नगरात लच्छी नावाची मुलगी आपल्या आजीसोबत राहात होती. लच्छीच्या अंगणात एक मोर अधूनमधून नाचायचा. लच्छीनं त्याला रोज येऊन नाचण्याचा आग्रह केला. मोर म्हणाला, लच्छी त्याच्यासारखाच नाच करायला तयार असेल तर मोर रोज नाच करायला येईल. लच्छीनं ते कबूल केलं. मोर रोज यायचा व नाचायचा. लच्छी त्यानंतर अगदी 'डिट्टो' मोरासारखं नाचायची. असेच कितीतरी दिवस गेले. लच्छीला हळूहळू मोरासारखे 'डिट्टो' नाचायचा कंटाळा यायला लागला. ती स्वत:ला आवडेल असं नाचायला लागली. आता लच्छीच्या नृत्यातून तिचा विचार, तिचा अभ्यास स्पष्ट दिसायचा. मोर स्तिमित होऊन लच्छीचा नाच बघत राहायचा.

एके दिवशी मोर लच्छीला म्हणाला, ''लच्छे, आता तू जास्त छान नाचतेस!''

लच्छी ठसक्यात म्हणाली, ''होच मुळी. कारण आता मी तुझी 'कॉपी' करत नाही ना ! कळलं मोरा?'' मोराला लच्छीचं म्हणणं कळलं आणि पटलं देखील.

माझ्या मित्रांनो, तुम्हाला पटलं का लच्छीचं म्हणणं?

– **रेणू गावस्कर** (सामाजिक कार्यकर्त्या)

मी स्वत:च कोणाची कॉपी नाही. त्यामुळे मी कॉपी करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. नट म्हणून मी कोणाचे तरी अवलोकन करतो; पण ती कॉपी नाही. ते त्या भूमिकेचे पुनरुज्जीवनच असते.

जे अभिनयाच्या क्षेत्रात मला जाणवले, ते जीवनात प्रत्येक ठिकाणीच सत्य असते. तुम्हा विद्यार्थ्यांच्या बाबतीत अभ्यास, परीक्षा या संदर्भातही ते लागू होते ! जे आपण अभ्यासलेच नाही, जे आपल्याला समजलेच नाही, त्याची 'कॉपी' आपण का करावी? त्यापेक्षा जे जे आपण अभ्यासतो; ते आपण समजून घेतले पाहिजे. आपल्या व्यक्तिमत्त्वात उमटले पाहिजे. प्रत्येक माणूस जन्माला येताना काही ना काही चांगले गुण घेऊन येतो. ते गुण विकसित करावेत. प्रत्येक व्यक्तीला एक स्वयंप्रतिभा असते. 'मी स्वयंभू आहे. मी स्वबळावर गुण मिळवीन व स्वत:चा विकास करण्याचा प्रयत्न करीन,' हा विचार मनात पक्का ठेवलात तर तुम्हाला कधीच कॉपी करावी, असे वाटणार नाही.

– **श्रीकांत मोघे** (ज्येष्ठ अभिनेता)

कॉपी म्हणजे 'नक्कल', ती आपण का करायची? ईश्वराने प्रत्येकाला वेगळे बनविले आहे आणि वेगवेगळी कुवत दिलेली आहे. आपण आपल्या स्वत:सारखेच राहावे. आपल्यातील सामर्थ्यस्थळे ओळखून आपले सामर्थ्य आपण स्वत: वाढवावे. त्यातच आपल्या व्यक्तिमत्त्वाचे सौंदर्य आहे. 'स्वत:'सारखे राहा आणि मोठे व्हा.

– **नीला सत्यनारायण** (निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र)

परीक्षेसाठी अभ्यासाची तयारी नसेल तर कॉपी करण्यासारख्या युक्त्या–प्रयुक्त्या सुचू लागतात. कॉपी पकडली गेली नाही, तर कदाचित तुम्ही पासही व्हाल; परंतु कॉपीची ही सवय तुम्हाला आयुष्यभर घातक ठरू शकेल. कॉपी करणे हा एक प्रकारचा भ्रष्टाचार आहे. त्यात तुम्ही इतरांबरोबर स्वत:लाही फसविता. कॉपी करणे हा नैतिक गुन्हा आहे. म्हणून उत्तम अभ्यास करून परीक्षेत उत्तम यश मिळवणे, हेच तुमचे ध्येय असायला हवे.

– **रवी पंडित** (संचालक, के. पी. आय. टी.)

सौर फाल्गुन शके १९३५ / मार्च २०१४ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर १० फाल्गुन, शके १९३५ /१ मार्च २०१४
पंजीकरण क्रमांक (RNI NO.)MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Published & Posted at S.P. Post Office On 1st of Every Month**

सौर दिनदर्शिका
शके १९३५

| मार्च २०१४ | | फाल्गुन चैत्र |
|---|---|---|
| श. | 1 | १० |
| र. | 2 | ११ |
| सो. | 3 | १२ |
| मं. | 4 | १३ |
| बु. | 5 | १४ |
| गु. | 6 | १५ |
| शु. | 7 | १६ |
| श. | 8 | १७ |
| र. | 9 | १८ |
| सो. | 10 | १९ |
| मं. | 11 | २० |
| बु. | 12 | २१ |
| गु. | 13 | २२ |
| शु. | 14 | २३ |
| श. | 15 | २४ |
| र. | 16 | २५ |
| सो. | 17 | २६ |
| मं. | 18 | २७ |
| बु. | 19 | २८ |
| गु. | 20 | २९ |
| शु. | 21 | ३० |
| श. | 22 | चै.१ |
| र. | 23 | २ |
| सो. | 24 | ३ |
| मं. | 25 | ४ |
| बु. | 26 | ५ |
| गु. | 27 | ६ |
| शु. | 28 | ७ |
| श. | 29 | ८ |
| र. | 30 | ९ |
| सो. | 31 | १० |



वरील प्रकाशचित्र वॉटर लिलीचे असून ते रायगड परिसरात टिपले आहे. या फुलांचा फुलण्याचा काळ ऑगस्ट ते ऑक्टोबर हा आहे.

**प्रकाशचित्र**
**डॉ. प्रकाश जोगळेकर, दत्तवाडी, पुणे**

वरील प्रकाशचित्राला समर्पक अशा **कुसुमाग्रजांच्या कवितेतील** काही ओळी पुढे दिल्या आहेत. तुम्हीदेखील या प्रकाशचित्राला समर्पक ओळी सुचवा व छात्र प्रबोधनकडे पाठवा.

**साऱ्याच कळ्यांना जन्मसिद्ध, हक्क आहे फुलण्याचा**
**मातीमधली वतनवारसा, आकाशावर कोरण्याचा !**
**प्रत्येक कळीत जागत असतो, निर्धार फूल होण्याचा**
**दिमाखाने दिसण्याचा अन्, सुगंधाने असण्याचा !**

**पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिन कोड क्रमांक नसल्यास कळवा.**

**प्रति –**

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
**www.chhatraprabodhan.org**
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**या अंकाची किंमत : ₹ १५/–**
**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/–**



**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन.